

इरफान खान यांची शेवटची लढाई.. (पान ७ वर)

दैनिक

# दिव्य वतन

जनसामान्यांचा बुलंद आवाज

नागपूर, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, वर्धा, यवतमाळ, अकोला, वाशीम, बुलडाणा, नांदेड, हिंगोली, परभणी, लातूर, धाराशिव, अहिल्यानगर, छ. संभाजीनगर, बीड, जालना, नंदुरबार, धुळे, नाशिक




अमरावतीच्या प्रवाशांना तिकीट दरवाढीचा फटका नाही (पान ८ वर)

RNI Number MAHBIL/२५/A०७८१ E-mail : divyawatan@gmail.com शुक्रवार दिनांक २६ डिसेंबर २०२५ अंक : १४२ वा वर्ष : २ रे, मूल्य : ३ रुपये, पृष्ठे : ८


## महत्त्वाचे...

### बलात्कारी मोकळा आणि पीडितेचे कुटुंबीयांनाच पोलिसांकडून मारहाण

पुणे- उत्तर प्रदेशातील बहुचर्चित उन्नाव बलात्कार प्रकरणातील मुख्य दोषी आणि माजी भाजप आमदार कुलदीपसिंह सेगर याला दिल्ली उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केल्यामुळे देशभरात संतापाची लाट उसळली आहे. सत्र न्यायालयाने सुनावलेली जन्मठेपेची शिक्षा स्थगित करताना सेगरने सात वर्षांहून अधिक काळ कारावास भोगल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले, मात्र या निर्णयाच्या निषेधार्थ आंदोलन करणाऱ्या पीडितेच्या आईला आणि पीडितेला पोलिसांनी ताब्यात घेतल्याने संताप अधिकच वाढला आहे. या गंभीर घटनेवर शिवसेना ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी तीव्र शब्दांत प्रतिक्रिया दिली असून, पीडित कुटुंबावर होणाऱ्या या कारवाईबद्दल त्यांनी प्रशासनाविरोधात जोरदार संताप व्यक्त केला आहे.आदित्य ठाकरे यांनी ट्विट करत म्हटले की, उन्नाव बलात्कार प्रकरणातील दोषी, भाजपचे माजी आमदार कुलदीप यांची शिक्षा स्थगित केल्याने जगभरात संतापाची लाट उसळली आहे. याशिवाय, बलात्कारी व्यक्तीविरुद्ध निषेध करणाऱ्या पीडितेला आणि तिच्या आईला पोलिसांनी केलेली मारहाण धक्कादायक आहे. निवडणुकीच्या काळात भाजपने लाडकी बहीणसारख्या घोषणा दिल्या आणि योजना आखल्या.

### अजिंठा घाटात पुन्हा वाहतूक कोंडी



छत्रपती संभाजीनगर आणि जळगाव जिल्ह्याला जोडणाऱ्या अजिंठा घाटात आज एका अवजड ट्रकमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे. घाटाच्या वळणावरच ट्रक बंद पडल्याने एका बाजूची वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली असून, वाहनांची एक ते दीड किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या आहेत. यामुळे प्रवाशांचे विशेषतः लहान मुले आणि वृद्ध नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, आज सकाळी एक अवजड ट्रक अजिंठा घाटातील एका तीव्र वळणावर अचानक बंद पडला. घाटातील रस्ता अरुंद असल्याने मागून येणाऱ्या वाहनांना पुढे जाण्यास जागा उरली नाही. अवघ्या काही वेळातच या ठिकाणी शेकडो वाहने अडकून पडली. यामध्ये खाजगी बसेस, दुचाकी, चारचाकी वाहने आणि अत्यावश्यक सेवेतील वाहनांचाही समावेश आहे. सध्या एका बाजूने हळूहळू वाहतूक सोडण्याचा प्रयत्न केला जात आहे.सध्या नाताळच्या सुट्ट्या आणि पर्यटनाचा हंगाम असल्याने अजिंठा लेणी पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांची मोठी गर्दी आहे. मात्र, अजिंठा घाटातील या वाहतूक कोंडीमुळे एसटी महामंडळाच्या बसेसही अडकल्या आहेत. त्यामुळे अनेक प्रवाशांच्या पुढील प्रवासाचे नियोजन कोलमडले असून, त्यांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.

अरुंद रस्ता आणि वाहनांच्या बिघाडांमुळे अजिंठा घाटात वारंवार कोंडीची समस्या निर्माण होत असून कायमस्वरूपी उपाययोजनांची गरज आहे. अलीकडेच नोव्हेंबर २०२५ मध्ये २० तासांहून अधिक काळ कोंडी झाली होती. ज्यामुळे एका थायलंडच्या पर्यटकाला मोटरसायकलवरून विमानतळावर जावे लागले होते. त्याआधीही मे २०२५ मध्ये वाहनाचे ब्रेक निकामी झाल्याने ५ तासांची कोंडी झाली होती, ज्यामुळे पर्यटकांना गैरसोयीचा सामना करावा लागला होता. घाटरस्त्याचे रुंदीकरण करणे गरजेचे असल्याचे प्रवाशांचे म्हणणे आहे.

# अख्खं कुटुंब 'डिजिटल अटके'त

## कारवाईची धमकी देत उकळले १.४० कोटी




**दिव्य वतन / प्रतिनिधी**

नागपूर : मनी लॉड्रिंगप्रकरणात अटक करण्याची धमकी देत सायबर गुन्हेगारांनी आयुध निर्माणीतील एक निवृत्त अधिकारी आणि त्याच्या कुटुंबीयांना तब्बल दहा दिवस डिजिटल अरेस्ट केले. या काळात गुन्हेगारांनी या कुटुंबाकडून तब्बल एक कोटी ४० लाख रुपये उकळले. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस गुन्हेगारांचा शोध घेत आहेत.

प्राप्त माहितीनुसार, तक्रारदार अधिकारी पत्नी व मुलासह नागपुरात राहतात. नऊ डिसेंबर रोजी सायबर गुन्हेगाराने निवृत्त अधिकाऱ्याच्या व्हॉट्सअॅप क्रमांकावर संपर्क साधला. 'मी मुंबई पोलिस दलाचा अधिकारी संजीव रॉय बोलत आहे. तुमच्या खात्यातून मनीलॉड्रिंग झाले आहे. ही रक्कम दहशतवादी कृत्यासाठी वापरण्यात आली आहे. तुमच्याविरुद्ध अटक वॉरंटही काढले आहे,' असे सांगत त्याने अधिकाऱ्याच्या व्हॉट्सअॅपवर अटक वॉरंट पाठविले. 'मनीलॉड्रिंगची पोलिसांसह दहशतवादविरोधी पथक व राष्ट्रीय तपास यंत्रणेनेही याची दखल घेतली आहे. या यंत्रणाही तुम्हाला अटक करतील,' अशी धमकी सायबर गुन्हेगाराने अधिकाऱ्याला दिली. त्यानंतर 'दहशतवादविरोधी पथकाचे अधिकारी आता तुमच्याशी बोलतील,' असे म्हणत त्याने अन्य एका व्यक्तीकडे कॅमेरा फिरवला. यावेळी दोन जण पोलिसांच्या गणवेशात तर अन्य साध्या गणवेशात होते. पोलिसाच्या गणवेशात असलेल्या एका गुन्हेगाराने त्यांना अटकेची भीती दाखवली. हे सर्व निवृत्त अधिकाऱ्याची पत्नी व मुलगा बघत होते. अटकेच्या भीतीने तेसुद्धा घाबरले.

अटक टाळण्यासाठी निवृत्त अधिकाऱ्याने सायबर गुन्हेगाराने दिलेल्या बँक खात्यात एक कोटी ४० लाख रुपये जमा केले. दहा दिवसांनंतरही गुन्हेगार आणखी पैसे मागायला लागले. त्यामुळे अधिकाऱ्याने नातेवाइकांकडे पैशाची मागणी केली. त्याला संशय आला. सखोल चौकशी केली असता अधिकारी व त्याचे कुटुंब डिजिटल अरेस्ट असल्याचे त्याच्या लक्षात आले.

वायुसेनेच्या निवृत्त अधिकाऱ्याला ८९ लाखांचा गंडा

शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास दर महिन्याला ६० हजार रुपये नफा मिळविण्याचे आमिष दाखवून सायबर गुन्हेगारांनी वायुसेनेच्या निवृत्त अधिकाऱ्याला ८९ लाखांनी गंडा घातला. याप्रकरणी सायबर पोलिसांनी दोन ठकबाजांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. भारतीय वायूदलातून निवृत्त झालेले हे अधिकारी नागपुरात राहतात. मे महिन्यात त्यांना समाजमाध्यमांवर केंद्रीय अर्थमंत्री व बड्या व्यावसायिकाचे छायाचित्र असलेले वृत्त दिसले. 'शेअर बाजारात २५० डॉलर्सची गुंतवणूक केल्यास दर महिन्याला ६० हजार रुपये मिळतील,' असे त्यात लिहिले होते. त्यांनी वृत्तात दिलेली लिंक उघडली. ती 'मोंटू डॉट कॉम'ची होती. अधिकाऱ्याने त्यावरील बँक खात्यात वेळोवेळी एकूण ८९ लाख रुपये जमा केले.

## उद्धव ठाकरेंनी मराठी माणसांसाठी काय केले ?

### सुषमा अंधारेंनी शिंदेंना घातली पोस्ट डिलीट न करण्याची गळ

**दिव्य वतन /वृत्तसेवा**




मुंबई- सत्ताधारी शिवसेनेचे सर्वेसर्वा तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाकरे बंधूंच्या युतीवर निशाणा साधला होता. या प्रकरणी त्यांनी उद्धव ठाकरे यांनी मुंबई व तेथील मराठी माणसांसाठी काय केले? असा खोचक सवाल उपस्थित केला होता. ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी या प्रकरणी शिंदेंच्या 2020 मधील एका ट्विटचा दाखला देत ठाकरेंनी मुंबईसाठी काय केले हे दाखवून दिले आहे. तसेच शिंदेंना ही पोस्ट डिलीट न करण्याची गळही घातली आहे.

उद्धव ठाकरे व राज ठाकरे यांनी बुधवारी मुंबई महापालिका निवडणुकीच्या तोंडावर युती करण्याची घोषणा केली आहे. यामुळे महायुतीचे मुंबईतील राजकीय समीकरण बिघडल्याचा दावा केला जात आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या प्रकरणी ठाकरे बंधूंवर निशाणा साधत त्यांनी मुंबई व तेथील मराठी माणसांसाठी काहीच केले नसल्याचा दावा केला होता. त्यांच्या या टीकेनंतर सुषमा अंधारे यांनी एकनाथ शिंदे यांची एक जुनी पोस्ट पोस्ट शेअर केली आहे.

उद्धव साहेबांनी मुंबई आणि मुंबईतल्या मराठी माणसासाठी काय केलं याचा लेखाजोखा तुम्ही स्वतः मांडत आहात. फक्त पोस्ट डिलीट करू नका तुम्हाला तुमचे गुरु आनंद दिघे यांची शपथ आहे, असे सुषमा अंधारे यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे. त्यांची ही पोस्ट काही वेळातच सोशल मीडियावर व्हायरल झाली.

## ठाण्यात शिवसेना शिंदे गटाला मोठा धक्का:माजी महापौर मीनाक्षी शिंदेंचा राजीनामा, एकनाथ शिंदेंच्या निर्णयाकडे सर्वांचे लक्ष

**दिव्य वतन /वृत्तसेवा**



मुंबई- महापालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकारणात मोठ्या घडामोडी घडताना दिसत आहेत. त्याचसोबत अनेक ठिकाणी नाराजी नाट्य देखील पाहायला मिळत आहे. पुण्यात शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष प्रशांत जगताप यांनी राजीनामा दिल्याचे ताजे असतानाच आता ठाण्यात शिवसेना शिंदे गटाच्या महिला आघाडी प्रमुख आणि माजी महापौर मीनाक्षी शिंदे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांचा राजीनामा हा शिंदे गटासाठी मोठा धक्का मानला जात आहे.

सध्याच्या राजकीय परिस्थितीचा विचार करून या पदावर काम करण्यास असमर्थ असल्याने राजीनामा देत असल्याचे कारण मीनाक्षी शिंदे यांनी दिले आहे. महापालिकेच्या निवडणुकीच्या तोंडावर मीनाक्षी शिंदे यांनी राजीनामा दिल्याने शिवसेनेसाठी हा धक्का असल्याचे मानले जात आहे. आता यावर पक्ष प्रमुख तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे काय निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

या वादाचे मूळ प्रभाग क्रमांक 3 (मनोरमा नगर) मधील राजकीय घडामोडींमध्ये आहे. माजी नगरसेवक भूषण भूईरे यांना पुन्हा तिकीट मिळू नये, यासाठी काही शाखाप्रमुखांनी आक्रमक पवित्रा घेतला होता. यामध्ये विक्रांत वायचळ यांचा पुढाकार होता. मात्र, ही कृती 'पक्षविरोधी' ठरवत शिवसेनेने वायचळ यांची तडकाफडकी हकालपट्टी केली. वायचळ हे मीनाक्षी शिंदे यांचे अत्यंत निकटवर्तीय मानले जातात, त्यामुळे या कारवाईचा थेट फटका शिंदे गटाला बसला आहे.

मीनाक्षी शिंदे यांनी 2017 मध्ये ठाणे महापालिकेत शिवसेनेला बहुमताचा आकडा (67 जागा) गाठून दिल्यानंतर महापौरपद

## रोज नई सुबह है... पक्षातील नाराजीला सुप्रिया सुळेंचा स्पष्ट इशारा; 'माझं पोट मोठं आहे' सुप्रिया सुळेंचं वक्तव्य चर्चेत

**दिव्य वतन /वृत्तसेवा**



पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाला धक्का देणाऱ्या प्रशांत जगताप यांच्या राजीनाम्यानंतर राजकीय वातावरण तापले असतानाच, खासदार सुप्रिया सुळे यांनी दिलेल्या एका वक्तव्याने चर्चेला वेग आला आहे. प्रशांत जगताप यांना शुभेच्छा... रोज नई सुबह है; माझं पोट खूप मोठं आहे, असे म्हणत सुळेंनी केवळ प्रतिक्रिया दिली नाही, तर पक्षातील नाराजी, बंडखोरी आणि संभाव्य युतीवर अप्रत्यक्ष पण ठोस संदेश दिला आहे. राजीनाम्याच्या पार्श्वभूमीवर आलेलं हे विधान केवळ शब्दांचा खेळ नसून, आगामी महापालिका निवडणुकांआधी राष्ट्रवादीतील राजकीय समीकरणांची दिशा स्पष्ट करणारे मानले जात आहे.पुण्याच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडवणारी घटना मंगळवारी घडली. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाचे पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी आपल्या पदाचा तसेच पक्षाच्या प्राथमिक आणि क्रियाशील सदस्यत्वाचा राजीनामा दिला. पुणे महानगरपालिकेच्या प्रवेशद्वारासमोर आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी स्वतः हा निर्णय जाहीर केला. जवळपास 27 वर्षांची राजकीय-सामाजिक कारकीर्द असलेल्या जगताप यांनी अत्यंत भावनिक शब्दांत आपल्या निर्णयामागील भूमिका मांडत, आजवर मिळालेल्या संधींसाठी पक्षनेतृत्वाचे आभार मानले. पद किंवा सत्तेसाठी नव्हे, तर पुरोगामी विचारांची चळवळ पुढे नेण्यासाठी आपण राजकारणात प्रवेश केला होता आणि हेच ध्येय पुढेही कायम राहील, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रशांत जगताप म्हणाले की, 27 वर्षांपूर्वी सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात पाऊल टाकताना कोणत्याही पदाची अपेक्षा नव्हती. समाजपरिवर्तनाच्या विचारांशी निष्ठा राखत मी काम करत राहिलो. आजही माझी वैचारिक भूमिका बदललेली नाही. यापुढेही सामाजिक आणि राजकीय जीवनात मी पुरोगामी विचारांसाठी कार्यरत राहीन, असे त्यांनी स्पष्ट केले. आजपर्यंत अत्यंत निष्ठेने साथ दिलेल्या सर्व कार्यकर्त्यांचे त्यांनी मनापासून आभार मानले. तसेच, भविष्यातही संघर्षाच्या वाटेवर जे सहकारी माझ्यासोबत राहतील, त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. शहराध्यक्ष पदाचा राजीनामा देण्याचा निर्णय हा अत्यंत विचारपूर्वक घेतलेला असून, तो कोणत्याही क्षणिक भावनेतून घेतलेला नाही, असेही त्यांनी ठामपणे सांगितले. या राजीनाम्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्याध्यक्ष आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी मोजक्या पण अर्थपूर्ण शब्दांत प्रतिक्रिया दिली. पुण्यात प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना सुप्रिया सुळे म्हणाल्या की, प्रशांत जगताप यांना मनापासून शुभेच्छा.

## महापालिका निवडणुकांचे रणशिंग फुंकले!

### अजित पवार गटाकडून 40 'स्टार प्रचारकांची' यादी जाहीर

**दिव्य वतन /वृत्तसेवा**




मुंबई- राज्यातील महानगरपालिका निवडणुकांचे बिगुल वाजले असून 15 जानेवारी रोजी मतदानाची प्रक्रिया पार पडणार आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांनी कंबर कसली असून, राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाने आपली रणनीती स्पष्ट करत 40 'स्टार प्रचारकांची' यादी जाहीर केली आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी ही माहिती दिली आहे.निवडणुकीच्या रणधुमाळीत आपल्या पक्षाचे वर्चस्व निर्माण करण्यासाठी अजित पवार गटाने अनुभवी नेत्यांसह युवा चेहऱ्यांनाही या 40 स्टार प्रचारकांच्या यादीत स्थान दिले आहे. आगामी काळात होणाऱ्या सभा आणि प्रचाराच्या फेऱ्यांमध्ये हे नेते राज्यभर फिरून पक्षाची भूमिका मांडणार आहेत. सुनील तटकरे यांनी या यादीची घोषणा केल्यानंतर आता कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, या निवडणुकीत अनेक अनपेक्षित युती पाहायला मिळत आहेत. शिवसेना ठाकरे गट आणि मनसे यांनी एकत्र येत युतीची घोषणा केली आहे. तर दुसरीकडे भाजप आणि शिवसेना शिंदे गट यांच्यात युतीबाबत अंतिम चर्चा सुरू आहे. विशेष म्हणजे, शरद पवार आणि अजित पवार या दोन्ही राष्ट्रवादी गटांनी देखील एकत्र निवडणूक लढवण्याबाबत चर्चा सुरू केल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

## धर्म पाहून मतदान करणाऱ्यांनो, तुम्ही धर्मांतर करणार का ?

### नसाल तर मग RSS, BJPचा मुद्दा खरा आहे का? प्रकाश आंबेडकरांचा मतदारांना सवाल

**दिव्य वतन /वृत्तसेवा**



अकोला : देशातील बदलत्या राजकीय आणि सामाजिक वातावरणावर भाष्य करताना वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा प्रकाश आंबेडकर यांनी थेट मतदारांनाच आरसा दाखवला आहे. "जे लोक केवळ धर्माला पाहून मतदान करतात, त्यांना माझा एकच प्रश्न आहे की, तुम्ही किंवा तुमचे कुटुंब भविष्यात धर्मांतर करणार आहात का? जर तुम्ही धर्मांतर करणार नसाल, तर मग आरएसएस आणि भाजप जो 'धर्माचा' मुद्दा मांडत आहेत, तो तुम्हाला खरा का वाटतो?" अशा अत्यंत बोचऱ्या आणि थेट प्रश्नाने आंबेडकरांनी राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडवून दिली आहे.

प्रकाश आंबेडकर यांनी धर्माच्या नावावर होणाऱ्या ध्रुवीकरणावर प्रहार करताना सांगितले की, भाजप आणि आरएसएसने जाणीवपूर्वक लोकशाहीला हुकूमशाहीत परिवर्तित करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

"तुम्ही धर्मांतर करणार नसाल तर मग धर्माला धोका आहे, हा त्यांचा मुद्दा तुम्हाला पटतोच कसा? हा केवळ जनतेला गुमराह करण्याचा प्रकार आहे," असे त्यांनी म्हटले आहे.

आम्ही आणीबाणी भोगली आहे, पण सध्याची पिढी एका वेगळ्याच छुप्या हुकूमशाहीकडे ढकलली जात असल्याचा इशाराही त्यांनी दिला.

केवळ भाजपवरच नव्हे, तर काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांवरही प्रकाश आंबेडकर यांनी निशाणा साधला. राहुल गांधींचा उल्लेख करत ते म्हणाले, " राहुल गांधी हे एपस्टीन मध्ये आपल्या पंतप्रधानांचे फोटो आहेत का? याबाबत प्रश्न विचारत नाहीत. पेगेसीस किंवा इतर विषयात कोणताही विरोधी पक्षातील नेता प्रश्न विचारत नाही. ईडी, सीबीआयचा ससेमीरा विरोधी पक्षातील नेत्यांच्या मागे लागलेला आहे. त्यामुळे कोणताही विरोधी पक्षनेता बोलायला तयार नाही."

मुंबई महानगरपालिका निवडणुकीत काँग्रेससोबत जाणार का? या प्रश्नावर आंबेडकरांनी अत्यंत सावध आणि स्पष्ट भूमिका घेतली. ते म्हणाले, "मी जर तोंड उघडले तर काँग्रेसला देशात फटका बसेल आणि त्याचा फायदा भाजपला होईल, म्हणून मी सध्या काही गोष्टी बोलत नाही. त्यामुळे मी काँग्रेसच्या गोष्टी आम्ही गुलदस्त्यात ठेवतो.

मुंबईत काँग्रेस सोबत जायचे की नाही याबाबत आम्ही अजून भूमिका घेतलेली नाही. मात्र, जोपर्यंत सहयोगी पक्षाला सन्मान दिला जात नाही, तोपर्यंत आम्ही युतीचा विचार करणार नाही. आम्ही शिजवलेले तुम्ही आयते खायला बघत असाल, तर ते शक्य नाही."

## महत्त्वाचे...

### नागपूर-पुणे मार्गावर प्रवाशांची अधिक ये-जा

नागपूर : २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक येथे रेल्वे प्रशासन जोरदार तयारी करीत आहे. नाशिक रोड रेल्वेस्थानकाचा सर्वांगीण विकास करण्याचे नियोजन रेल्वे प्रशासनाने आखले आहे. नाशिक रोड, देवळाली, औंढा, कस्बे सुकेने आणि खेरवाडी या रेल्वेस्थानकांवर मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधा उभारण्यात येत आहेत. यामध्ये आधुनिक प्रतिक्षालये, प्रवाशांसाठी पादचारी पूल, पिण्याच्या पाण्याची सुधारित व्यवस्था, फिरते जिने (एस्केलेटर), तसेच इतर प्रवासी सुविधांचा समावेश आहे. यावर १,५०० कोटी खर्च करण्यात येत आहे, असे मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक विवेककुमार गुप्ता म्हणाले. याशिवाय, कुंभमेळ्यासाठी नागपूरहून विशेष रेल्वेगाड्या सोडण्यात येईल, असेदेखील त्यांनी सांगितले. 'अजनी रेल्वे स्थानकाला नवीन चार फलाट मिळणार आहेत. येत्या चार महिन्यांत या फलाटांचे काम पूर्ण होणार आहे. यामुळे या स्थानकावर एकूण सात फलाट प्रवाशांच्या सेवेत कार्यरत असतील', अशी माहिती मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक विवेककुमार गुप्ता यांनी बुधवारी पत्रपरिषदेत दिली.

### प्रॉपर्टीचा वाद विकोपाला, काकाकडून पुतण्यावर गोळीबार

नागपूर : नागपूर शहरालगत असलेल्या हिंगणा पोलीस स्टेशन हद्दीतील गुमगाव परिसरात बुधवारी सकाळी मालमत्तेच्या वादातून थेट गोळीबाराची घटना घडल्याने एकच खळबळ उडाली. या घटनेत काका, पुतण्या आणि पुतण्याचा मित्र असे तिघे जखमी झाले असून सर्वांवर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. कुटुंबातील अंतर्गत वाद हिंसक वळणाला गेल्याने गुमगाव परिसरात काही काळ दहशतीचं वातावरण निर्माण झालं होतं.मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी सकाळी सुमारे साडे आठ वाजताच्या सुमारास 87 वर्षीय नाना देवतळे आणि त्यांचा 42 वर्षीय पुतण्या प्रवीण उर्फ बबलू चंद्रकांत देवतळे यांच्यात मालमत्तेच्या वादावरून तीव्र शाब्दिक चकमक झाली. हा वाद इतका वाढला की त्याचं रूपांतर हाणामारीत झालं. संतप्त झालेल्या पुतण्या प्रवीण देवतळे यांनी आपल्या काकांवर फावड्याने हल्ला केला, ज्यात नाना देवतळे जखमी झाले.

### निधन वार्ता



**श्री ज्ञानेश्वर हिम्मतराव धोटे** यांचे निधन वय - ७७झिंगाबाई टाकळी येथील रहिवासी ज्ञानेश्वरराव धोटे यांचे बुधवारी प्रदीर्घ आजाराने निधन झाले. मृत्युसमयी ते ७७ वर्षाचे होते. त्यांचे अंतिम संस्कार दिनांक 25 डिसेंबर रोजी गुरुवारी सकाळी 10 वाजता. मानकापूर घाटावर करण्यात येणार आहे.



श्रीमती सुमनबाई घनश्यामजी बैंगने हिचे निधन वय - 79 अवधुत नगर नं. 2 नागपुर निवासी श्री निलेश / कमलेश बैंगने (न्यूज पेपर वाटणारे) यांच्या आई श्रीमती सुमनबाई घनश्यामजी बैंगने, वय 79 वर्ष यांच बुधवारी 24 डिसेंबर रोजी वृद्ध अवस्थेमुळे निधन झाले. मानेवाडा घाटावर अंतिम संस्कार करण्यात आले, त्यांच्या मागे 2 मुले, 4 मुली व बराच मोठा आप्त परिवार आहे.

# आम आदमी पार्टी नागपूर महानगरपालिकेच्या निवडणूक रिंगणात

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**

नागपूर : दिनांक 25 12 2025 रोजी आम आदमी पार्टीने आपली 2026 मध्ये होणारी नागपूर महानगरपालिका निवडणुकी ची दुसरी यादी जाहीर केली. या यादीमध्ये 151 पैकी पहिली व दुसरी यादी पकडून 29 उमेदवार जाहीर करण्यात आले.

ही यादी महाराष्ट्र प्रदेश संघटन मंत्री भूषण ढाकूलकर व नागपूर शहर अध्यक्ष अजिंक्य कळंबे द्वारा जाहीर करण्यात आली. येणारी महानगरपालिका आम आदमी पार्टी लोकांच्या मूळभूत मुद्द्यांवरती लढवीत आहे. या पत्रकार परिषदेत माजी नगरसेवक कृष्णा भाऊ यांनी आम आदमी पार्टीमध्ये प्रवेश घेतला.

ही पत्रकार परिषद घेत असताना प्रदेश सचिव सुनील दादा वडसकर, डॉ शाहिद अली जाफरी व सोनूजी फटिंग, नागपूर महासचिव अमेय नरनवरे उपस्थित होते.

आम आदमी पार्टी नागपूर महानगरपालिकेच्या १५१ जागांपैकी प्रथम यादीमधील 10 व दुसऱ्या यादीत 19 उमेदवारांची नावे जाहीर करण्यात येत आहे.

आम आदमी पार्टी नागपूर तर्फे नागपूर महानगरपालिका निवडणुकीची दुसरी यादी

तनुजा गोडमारे प्रभाग ११ ब
आशिष जगनित प्रभाग ११ अ
जया संजय मोरे प्रभाग ३ ड
कमलेश जरीत प्रभाग २६ ड
नफीज शेख प्रभाग २४ ड
रोशन डोंगरे प्रभाग ९ अ
क्लायमेट डेव्हिड प्रभाग ९ ड
नरेश देशमुख प्रभाग ४ ड
शमीन बानो इर्शाद मामालाधारी प्रभाग ४ क
संजय चांदेकर प्रभाग ६ ब




नीलिमा नारनवरे प्रभाग ६ अ
विनोद काकडे प्रभाग ३२ ड
प्रशांत अहिरराव ३२ ब
प्रमोद कोठाळकर प्रभाग २१ ड
कीर्ती गोर (बाथो) प्रभाग १९ क
अलका पोपटकर प्रभाग ९ क
अजय धर्मे १६ ड
कमलेश भदाडे २३ ड
आम आदमी पार्टी नागपूर
डॉक्टर अमेय नरनवरे
नागपूर शहर महासचिव

# मनुस्मृती चे दहन हे एका जातीसाठी नव्हे तर भारत देशाच्या मुक्ती साठी होते : सुरज ढोणे

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**

नागपूर : भारत देशात खरी समता बंधुता, लोकशाही, स्वातंत्र्य देश प्रेम निर्माण झाले ते मनुस्मृती दहन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केल्याने मनुस्मृतीचे दहन हे एका जातीसाठी नव्हे तर भारत देशाच्या मुक्तीचे प्रतीक होते. असे प्रतिपादन सुरज ढोणे यांनी केले. ते आज आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात अध्यक्षास्थानावरू बोलत होते. प्रथम डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला आंरिमोचे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण



बागडे यांनी पुष्पहार अर्पण केले. प्रकाश कांबळे यांनी दिपप्रज्वलन केले. याप्रसंगी आंरिमोचे राष्ट्रीय संघटक देवेंद्र बागडे यांनी मनुस्मृतीचे दहन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केले नसते तर खरी समता या देशात नांदली नसती असे विचार मांडले धर्माजी बागडे बोलले मनुवादी विचार सरणीचा विरोधात एक जुट झाल्याशिवाय मार्ग नाही आम्ही तर मनुचे लचके तोडले तो आज आमच्या पासुन कोसो दूर पळाला हे खरे आहे परंतु आमच्यामध्ये आंतरीक मनुने जागा निर्माण केली आहे

आता आंतरीक मनुने निर्मुलन करणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले. जयदेव चिंवडे यांनी प्रास्ताविक केले राजु दादा पांजरे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जिवन चत्रिरावर प्रकाश टाकला कार्यक्रमाचे संचालन प्रा. रमेश दुपारे यांनी केले तर आभार पुण्यशील बोदिले यांनी मानले. कार्यक्रमात प्रविण आवळे, हंसराज उरकुडे, गौतम दहिकर, राजु कांबळे, चरणदास गायकवाड, रामभाऊ वाहणे सह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

# तालुका समन्वय समिती अध्यक्षपदी नरेश मोटघरे

**दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी**

मौदा : तालुका समन्वय समितीच्या अध्यक्षपदी नरेश मोटघरे यांची निवड करण्यात आली आहे. तसेच समितीचे सदस्य सचिव म्हणून तहसीलदार दत्तात्रय निंबाळकर यांची नियुक्ती करण्यात आली असून, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशानुसार ही निवड नुकतीच जाहीर करण्यात आली.

या समितीच्या सदस्यपदी विधानपरिषदेचे सदस्य कृपाल तुमाने, तालुका खरेदी-विक्री संघाचे उपसभापती खुशाल तांबडे, अशासकीय सदस्य म्हणून अंकित वाडीभस्मे, दिनकर आंबिलडुके, लंकेश डोरले, नरेश बावनकुळे, देवेंद्र कोंगे यांची निवड करण्यात आली.

अशासकीय महिला सदस्य म्हणून रोशनी बावनकुळे व शालिनी कुहीकर यांचा समितीमध्ये समावेश करण्यात आला आहे. तालुक्यातील विविध प्रशासकीय व विकासात्मक विषयांवर समन्वय साधून कामकाज गतिमान करण्यासाठी ही समिती महत्त्वांची भूमिका बजावणार आहे. तालुक्यातील सर्व शासकीय प्रमुख हे या समितीचे शासकीय सदस्य असतील. समितीच्या सर्व सदस्यांनी सर्व नियमांचे



काटेकोरपणे पालन करावे असे आदेशात नमूद आहे. नवनियुक्त अध्यक्ष व सदस्यांचे विविध स्तरातून स्वागत होत आहे.

# सावनेर पब्लिक CBSE स्कूलच्या विद्यार्थ्यांचे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात सुयश

**दिव्य वतन /अनिल अडकिने**

सावनेर-पंचायत समिती सावनेर यांच्या वतीने सन २०२५–२०२६ या शैक्षणिक वर्षातील ५३ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन दिनांक १६ डिसेंबर रोजी अभुदय ग्लोबल व्हिलेज स्कूल, बावनगाव येथे पार पडले. या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात सदर शाळेची विद्यार्थिनी कु. विधी अनिल अग्रवाल हिने स्टार्च बेस बायोडीग्रेडबल प्लास्टिक हे पर्यावरणपूरक मॉडेल सादर करून तृतीय क्रमांक प्राप्त केला.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. अशोक जिवतोडे, संस्थेचे सचिव डॉ. सौ. प्रतिभा जिवतोडे, उपाध्यक्ष श्री. अंबर जिवतोडे, संचालक श्री. रत्नाकर डहाके




पाटिल, प्राचार्या सौ. ममता अग्रवाल, सौ. वैशाली देशपांडे, विज्ञान शिक्षक प्रणय कापसे सर, पद्मा हिरतकर मॅडम, चंद्रकांत कोमुजवार, अमूल जीवतोड़े, प्रफुल नारनवरे, दिनेश निखाड़े तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



# ही भूक कधीही न संपणारी:आम्ही अनेक लोकांकडून चहा-चिवडा खाल्ला, इच्छुक उमेदवारांना नितीन गडकरींचा टोला

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**

नागपूर - आपल्या परखड मतांमुळे आणि सर्वांनाच धारेवर धरणारे नेते म्हणून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना ओळखले जाते. आता त्यांनी पुन्हा एकदा असेच वक्तव्य केले आहे. सध्या महाराष्ट्रात महापालिका निवडणुकीचे वातावरण सुरू असून इच्छुक उमेदवारांची गर्दी देखील वाढली आहे. यावर गडकारींनी त्यांच्या मिश्किल शैलीत वक्तव्य केले आहे. आजकाल पक्षांची आर्थिक स्थिती चांगली आहे. परंतु, आम्ही अनेक लोकांकडून चहा-चिवडा खाल्ला असल्याचे वक्तव्य त्यांनी केले आहे. तसेच उमेदवारी मिळवण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांवर बोलताना गडकरी म्हणाले, ही कधीही न संपणारी भूक.

दादा कोंडके यांच्या चित्रपटाचा दाखला देत नितीन गडकरी म्हणाले, गर्दीतील प्रत्येक व्यक्तीला वाटत असते की आपल्यालाच तिकीट मिळावे. मात्र जनता आता तितकीच हुशार झाली आहे. आजकाल पक्षाची आर्थिक स्थिती खूप चांगली आहे. परंतू आम्हीही अनेक लोकांकडून चहा-चिवडा खाल्ला आहे.

पुढे बोलताना नितीन गडकरी म्हणाले, एकदा मला एक व्यक्ती भेटली. त्याने चहा आणि जिलेबी खाऊ घातली, पण 'माझे काय होणार?' असा प्रश्न ती व्यक्ती विचारत होता. मी त्याला म्हणालो, तू खाऊ घाल, सर्व ठीक होईल. मात्र, त्यावेळी आमच्या हातात



काहीच नव्हते. तरीही तिकीट देणारे आम्ही नाहीत, हे त्यांना माहीत नव्हते. आजही अनेक लोक ताणून बसले आहेत. लोकांना वाटते की नितीनजी किंवा देवेंद्रजी सांगतील तर तिकीट मिळेल, असे वाटणे स्वाभाविक आहे, असेही गडकरी यावेळी म्हणाले.

एक महिला माझ्याकडे आली आणि मला एकदा नगरसेवक बनवा अशी इच्छा व्यक्त केली. आम्ही तिला नगरसेवक बनवले. मात्र महापौर बनवू शकलो नाही. त्यामुळे ती खूप रडू लागली. तिचे रडणे पाहून माझ्या आईने विचारले, हिच्या नवऱ्याचा मृत्यू झाला का? मी आईला सांगितले, नाही, हिला तिकीट मिळाले नाही म्हणून रडत आहे. नंतर तिला महापौर बनवले. त्यानंतर तिने आमदार होण्याची इच्छा व्यक्त केली. आणि आता ती नगरसेवकाच्या तिकीटासाठी तयार आहे, असे सांगत गडकरी म्हणाले की ही भूक कधीही न संपणारी आहे. महत्वाकांक्षा असणे स्वाभाविक आहे. कार्यकर्त्यांमध्ये आशा, अपेक्षा आणि आकांक्षा असणे चुकीचे नाही.

# खंडाळा येथे पोहचले अधिकारी शेतकऱ्याच्या शेतात

## शेकडो शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग:पिक पाहणी दरम्यान

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**

नागपूर : तालुक्यातील खंडाळा येथील प्रगतशील शेतकरी कैलास लिचडे यांच्या शेतात कलश सीड्स प्रा. लि. जालना या कंपनीच्या वतीने पिक पाहणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला ३०० हून अधिक शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवला असून महिला शेतकऱ्यांची उपस्थितीही लक्षणीय होती. यासोबतच व्यापारी वर्ग व विक्रेते बांधवांनी देखील मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

या वेळी कंपनीचे आर.एम. राहुल निकम यांनी कलश सीड्स प्रा. लि. कंपनीबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच विदर्भाचे मॅनेजर अनिल अंडे यांनी मिरची पिकाच्या लागवड, निगा व उत्पादन



वाढीबाबत शेतकऱ्यांना मौल्यवान मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात बोलताना शेतकरी कैलास लिचडे यांनी सांगितले की, गेल्या चार वर्षांपासून ते तलवार मिरचीची लागवड करत असून या वाणातून अधिक उत्पादन मिळत आहे. तलवार मिरची ही उत्पादनक्षम व शेतकऱ्यांसाठी फायदेशीर असल्याने सर्व शेतकऱ्यांनी या मिरचीची लागवड करावी, असे आवाहन त्यांनी केले.

या पिक पाहणी कार्यक्रमामुळे शेतकऱ्यांना नव्या तंत्रज्ञानाची माहिती मिळाली असून तलवार मिरची लागवडीबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. या कार्यक्रमाला शेतकरी भुजंगराव मुम्मेनेनी गोपाल लिचडे,अशा लिचडे यांच्या सह महिला शेतकरी उपस्थित होते.

# भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन परिषदेतर्फे भ्रष्टाचार निर्मूलन मार्गदर्शन व स्नेहमिलन उत्साहात संपन्न

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**

नागपूर :भ्रष्टाचार मुक्त समाज निर्मिती, नागरिकांमध्ये कायदेशोर जागृति व प्रशासनातील पारदर्शिता वाढ़विन्याच्या उद्देशाने भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन परिषदेच्या वतीने भ्रष्टाचार निर्मूलन मार्गदर्शन व स्नेहमिलन कार्यक्रम यशस्वीरित्या मोठ्या उत्साहात पार पड़ला. या कार्यक्रमात भ्रष्टाचार विरोधार्थ जनजागृती अभियानचे स्टीकर चे विमोचन करुण, भ्रष्टाचाराशी संबंधित, कायदे, तकरार नोंदविण्याची प्रक्रिया, नागरिकांचे हक्क, कर्तव्ये तसेच भ्रष्टाचार विरोधात लढा कसा उभा करावा याबाबत सवीस्तर मार्गदर्शन करण्यात आले. परिषदेच्या पदाधिकार्यांनी भ्रष्टाचार निर्मूलनासाठी सामाजतिल



प्रत्येक घटकाने सजग व निर्भीड़ पणे पूढ़े येण्याचे आवाहन केले. यावेळी बोलतांना परिषदेंच्या वरिष्ठ पदाधिकारी यानी सांगीतले की,"भ्रष्टाचार हा समाजाचा कणा मोडणारा प्रकार असुन, त्याचे निर्मूलन करण्यासाठी जनजागृती व संघटीत प्रयत्न आवश्यक आहेत." स्नेहमिलन कार्यक्रमाच्या माध्यमातुन परीषदेचे कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्त्ते व नागरिक यांच्यात आपुलकिचा संवाद साधत सहकार्य अधिक दृढ़ करण्यात आले. या कार्यक्रमाचा समारोप भ्रष्टाचार मुक्त भारतचा संकल्प घेऊन करण्यात आला. परिषदचे संस्थापक अध्यक्ष राजेश रंगारी, कार्याध्यक्ष अरविन्द ढेंगरे, कान्हेरे फाउंडेशनचे श्याम चौधरी, पत्रकार संगठनेचे चंद्रकांत भोयर, सुरेश गेडाम, पुरोहित कांबले, प्रज्ञा शीला ताई घाटे, युवराज सोमकूवर, अनिकेत रंगारी, राधेश्याम राजपूत, प्रकाश हुमने, मनोज जेरेल, बंदूकों मड़के, कमलेश मेश्राम, महेश बरके, सुशांत मून, विनोद शेंडे, अब्दुल कादिर, संजय पाटिल, भीमराव सहारे, बालू राघौरते, बालाजी राव, विनोद शेंडे, गजानन चकोले, मच्छिंद्र आंवले, इरफान खान, चांदुजी मते, धनराज बांबोले, प्रवीण फूलमाली, नामदेव शंभरकर, प्रभुदास त्यायवाडे, नरेश लोखंडे, किशोर चिवंदे, संदीप शोभने, राजू मून, रूपालिताई पाटिल, सरिता आर्मो, गमन राहंगडाले, माया बिसेन, अहिल्याबाई बलवीर, सुशीलबाई फूलमाली, सुन्दरबाई चचेरे, कल्पना बाराहाते, दिलीप दखने, चंद्रकला चौधरी, विलास वैतागे, अमित भोवरे तसेच कार्यक्रमाचे सदस्य, विविध सामाजिक संघटनाचे प्रतिनिधि, व मोठ्या संख्याने जागरूक नागरिक उपस्थित होते.

# सी आय टी यू तर्फे संविधान चौकात मनुस्मृति दहन दिन साजरा

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**

नागपूर :आशा व गटप्रवर्तक कर्मचारी युनियन सी आय टी यू नागपूर जिल्हा तर्फे २५ डिसेंबर मनुस्मृती दहन दिनानिमित्त नागपूरच्या संविधान चौकात मनुस्मृति ला नाकारून भारतीय संविधान जे प्रत्येक नागरिकांना समानतेचा अधिकार देतो त्यालाच आम्ही स्वीकारतो. आमच्या भारत देशात जातीच्या आधारावर निर्माण करण्यात येणारे राष्ट्र किंवा मनुस्मृती आम्ही स्वीकार करणार नाही. जातीचे राजकारण शासनकर्त्यांनी बंद करावं हा संदेश आज संविधान चौकात देऊन मनुस्मृतीच्या निषेध करण्यात आला. युनियनचे अध्यक्ष कॉ. राजेंद्र साठे यांनी सांगितले कि, मनुस्मृतीमध्ये २६ जानेवारी १९५० चे भारतीय संविधान निर्माण करण्यापूर्वी मनुस्मृतिद्वारे महिलांना तसेच आदिवासी व मागासवर्गीयांना दुय्यम दर्जा दिल्या जात होता. त्यांना शिक्षणाच्या किंवा नोकरीच्या संधी उपलब्ध नव्हत्या.

त्यामुळे मनुस्मृतीला नाकारून २५ डिसेंबर १९२७ रोजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मनुस्मृतीला नाकारत महाड येथे त्याचे दहन केले. भारतामध्ये राहणाऱ्या महिला असो किंवा पुरुष कोणत्याही जाती धर्माच्या असो त्यांना समानतेच्या अधिकार मिळावा असा संदेश त्यांनी दिला.

वरील दिनाचे औचित्य साधून देशभर मनुस्मृति दहन दिन त्याला नाकारून त्याचे दहन केले जाते. कार्यक्रमाला प्रामुख्याने कॉम्रेड राजेंद्र साठे, कॉम्रेड प्रीती मेश्राम, कॉम्रेड प्रमोद कावळे, गीता मेश्राम, लक्ष्मी मोरे, नालंदा गणवीर, सुजाता वासनिक, अनिता बागडे, संघमित्रा चव्हाण, पुष्पा टेंभरे, शीतल गेडाम प्रामुख्याने उपस्थित होते.



## महत्त्वाचे...

### गुंजकर कॉलेजमध्ये क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन



खामगाव : गुंजकर कॉमर्स सायन्स अँड आर्ट कॉलेज आवार येथे क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष तथा गुंजकर एज्युकेशन हब खामगाव चे अध्यक्ष प्रा रामकृष्ण गुंजकर सर यांच्या हस्ते क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन करण्यात आले त्या प्रसंगी संस्थेच्या सचिवा प्रा सो गुंजकर मॅडम कॉलेजचे प्राचार्य सतीश जी रायबोले सर जिजाऊ स्कूल ऑफ स्कॉलर चे प्राचार्य रवींद्र जी मांडवेकर सर तसेच कॉलेजचे सर्व प्राध्यापक शिक्षक टीचिंग अँड नॉन टीचिंग कर्मचारी उपस्थित होते अभ्यासासोबत विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी क्रीडा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले भरपूर विद्यार्थी असे असतात की ते अभ्यासामध्ये कमी असतात परंतु वेगवेगळ्या खेळांमध्ये प्राविण्य मिळवितात आजच्या सप्ताहामध्ये विद्यार्थ्यांच्या क्रिकेटच्या टूर्नामेंट आयोजित केल्या होत्या तसेच मुलींची रनिंग स्पर्धा सोबतच खो-खो चे आयोजन करण्यात आले होते संगीत खुर्ची सुद्धा आयोजित करण्यात आली होती अशा विविध स्पर्धा विद्यार्थ्यांच्या घेण्यात आल्या सरते शेवटी ज्या विद्यार्थ्यांनी टूर्नामेंट मध्ये विशेष प्राविण्य दाखविल्याबद्दल ज्या संघाचा विजय झाला त्यांना सरते शेवटी संस्थेच्या वतीने मानचिन्ह व त्यांचा सत्कार करण्यात आला अशी माहिती संस्थेच्या वतीने कळविण्यात येत आहे

### विद्यार्थ्यांनी महापुरुषांच्या आदर्शांचे अनुकरण करणे आवश्यक- इंगोले

अकोला - 'दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी'द्वारा संचालित श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. शिक्षणासाठी साधने, सुविधा आणि सामाजिक स्वीकार नसतानाही डॉ. बाबासाहेबांनी केलेले अथक प्रयत्न आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे प्रमुख वक्ते व मार्गदर्शक डॉ. किशोर इंगोले यांनी नमूद केले. आजच्या विद्यार्थ्यांनी सिनेअभिनेत्याचे अनुकरण करण्याऐवजी महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आदर्शांचे अनुकरण करावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष दि बी.जी.ई. संस्थेचे अध्यक्ष अ‍ॅड. मोतीसिंह मोहता होते. प्रमुख अतिथी डॉ. पवन माहेश्वरी, प्रमुख वक्ते व मार्गदर्शक डॉ. किशोर इंगोले, प्राचार्य डॉ. राजेश चंद्रवंशी प्रमुख उपस्थितीत होते. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रम समन्वयक डॉ. प्रविण कावळे, गौतम इंगोले, हर्षल बैस, अ‍ॅड. आकाश हिवराळे आदी उपस्थित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला हारार्पण व दिपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. व्यासपीठावरील सर्व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त सोमवारी आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ते डॉ. किशोर इंगोले यांनी विद्यार्थ्यांसमोर डॉ. बाबासाहेबांच्या जीवनातील विविध प्रसंग उलगडून त्यांच्या संघर्षमय जीवनाचा प्रेरणादायी आढावा मांडला.प्रास्ताविक शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष गौतम इंगोले यांनी केले. मनोगत डॉ. राजेश चंद्रवंशी यांनी व्यक्त केले. प्रमुख वक्त्यांचा परिचय प्रा. डॉ. प्रविण कावळे, समन्वयक, समान संधी करून दिला. सूत्रसंचालन डॉ. सुजाता ताडम यांनी आणि आभार प्रदर्शन प्रा. गणेश सातपुते यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक, शैक्षणिक, प्रशासकीय व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शैक्षणिक, प्रशासकीय व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# भारत जिनिंग कारखान्याला आग

## यंत्रे, कापूस जळून खाक कारण अनिश्चित; दोन तासानंतर आग आटोक्यात

**दिव्य वतन /प्रतिनिधी**

खामगाव - येथील औद्योगिक वसाहती मधील भारत जिनिंग कारखान्यात आज २४ डिसेंबर रोजी सकाळी अकरा वाजेच्या सुमारास आग लागली. या आगीत कारखान्यातील कापसाची जळून राख रांगोळी झाली असून काही यंत्रसामग्री आगीच्या भक्ष्यस्थानी पडली होती. पालिकेच्या अग्निशामक दलासह व कामगारांनी आग विझवण्यासाठी पाण्याचा मारा केला. तब्बल दोन तासाच्या परिश्रमानंतर ही आग आटोक्यात आली. ही आग कशामुळे लागली याचे निश्चित कारण समजू शकले नाही. शॉर्टसर्किटमुळे ही आग लागल्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे.

भारत कारखान्यातील जिनिंग विभागामधून धुराचे लोट निघत असल्याचे तेथील कामगारांना दिसून आले. कारखान्यात कापूस असल्यामुळे काही वेळातच आगीने रौद्ररूप धारण केले होते. ही आग इतकी भीषण होती की, आगीचे लोळ व धूर दुर पर्यंत दिसून येत होता.

त्यामुळे अनेक नागरिकांनी कारखान्याकडे धाव घेतली. यावेळी कारखान्यासमोर बघ्यांची मोठी गर्दी झाली होती. आगीमुळे काही तास औद्योगिक वसाहत परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. आग लागल्याचे लक्षात येताच कारखान्यातील कामगारांनी आग विझवण्याचा प्रयत्न केला. परंतु आग विझत नसल्याचे पाहून पालिकेच्या अग्निशामक दलाला पाचारण करण्यात आले. यावेळी दलाने पाण्याचा मारा करून आग आटोक्यात आणली. या घटनेत सुदैवाने कुठलीही जीवित हानी झाली नाही. आगीत किती रुपयाचा कापूस जळून खाक झाला, हे मात्र हे वृत्त लिहिपर्यंत समजू शकले नाही.



# गुटख्याची वाहतूक करणारा ट्रक पकडला 33 लाखांचा मुद्देमाल जप्त

**दिव्य वतन /प्रतिनिधी**

खामगाव : महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या दुटख्याची अवैधरित्या वाहतूक करणाऱ्या ट्रकला पकडून उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या पथकानी 22 लाख 46 हजारांच्या गुटख्यासह 33 लाखांचा मुद्देमाल जप्त केल्याची घटना खामगाव – अकोला मार्गावरील टेंभुर्णा फाट्याजवळ 25 डिसेंबरच्या रात्री उघडकीस आली.



येथील उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप पाटील यांच्या पथकाला माहिती मिळाली की, नांदुरा अकोला मार्गावरून गुटख्याच्या अवैधरित्या वाहतूक केली जात आहे. या गुप्त माहितीवरून पथकाने 25 डिसेंबर रोजी सायंकाळी नांदुरा अकोला महामार्गावरील टेंभुर्णा फाट्याजवळ नाकाबंदी करून वाहनांची तपासणी केली असता एक पांढऱ्या कलरचे डीसीएम ट्रक क्रमांक एम पी 09 जि एच 8165 ची तपासणी करून पाहणी केली असता त्यामध्ये अवैध गुटखा मोठ्या प्रमाणात आढळून आला. सदर ट्रक मध्ये अवैध गुटख्याचे एकूण 50 पोते एकूण रक्कम 22 लाख 46 हजार 400 रुपये तसेच ट्रक किंमत दहा लक्ष असा एकूण 33 लाख 46, 400 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी पोलिसांनी ट्रकचालक ब्रिजगोपाल गुलजारसिंग यदुवंशी (45) रा. इंदोर याच ताब्यात घेतले असून त्याचे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# आमदार समीर कुणावार यांचे जनसंपर्क कार्यालयात स्व.अटल बिहारी वाजपेयी यांची जयंती साजरी

**दिव्य वतन /प्रतिनिधी**

हिंगणघाट- भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांची जयंती आज शहरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सदर कार्यक्रम आज दि.२५ रोजी आमदार कुणावार यांचे स्थानिक जनसंपर्क कार्यालयात संपन्न झाला. उपरोक्त कार्यक्रमास आमदार समीर कुणावार यांच्यासह नवनिर्वाचित लोकनियुक्त नगराध्यक्षा डॉ. नयना उमेश तुळसकर, प्रा. डॉ. उमेश तुळसकर, जिल्हा महामंत्री आकाश पोहाणे, विधानसभा प्रमुख संजय डेहणे, भाजपा शहराध्यक्ष तथा नगरसेवक भूषण पिसे, समुद्रपूर येथील माजी नगराध्यक्ष गजानन राऊत, मंडळ अध्यक्ष शेषराव तुळणकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते. यावेळी माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या राष्ट्रहिताच्या, लोककल्याणकारी व प्रेरणादायी कार्यास अभिवादन करण्यात आले, याप्रसंगी अटलबिहारी वाजपेयी यांचे देशाप्रती मोठे योगदान असून त्यांचे राजकीय जिवन हे भारतीय राजकारणात मैलाचा दगड ठरला असल्याचे मनोगत आ कुणावार यांनी व्यक्त केले. उपरोक्त कार्यक्रमास माजी नगरसेवक मारोती साठे हिंगणघाट शहरातील नवनिर्वाचित नगरसेवक विक्रांत भगत, वामन मावळे, कमलेश उर्फ बंटी वाघमारे, राजू कामडी, रवींद्र रोहनकर, मनीष धानुलकर, रोहित हांडे, नरेश युवनाथे, धनंजय बकाने , दिनेश वर्मा, संजय माडे, सौरभ पांडे, अतुल नंदागवळी, निलेश ठोंबरे , सुदर्शन उर्फ सोनू गवळी, नवनिर्वाचित नगरसेविका अनिता मावळे, मंदा राऊत, पल्लवी बाराहाते, वैशाली काळे, सोनू कुबडे, दुर्गा चौधरी, वंदना मैंद , शितल मोहता, जयाताई बसंतानी, रवीला आखाडे , प्रतिभा पडोळे, मंगला कुमरे, प्राची प्रसाद पाचखेडे, अश्विनी मानेकर इत्यादी नगरसेवक व नगरसेविका सोबतच भाजपा कार्यकर्ते मोठ्या संख्येने सदर कार्यक्रमाला उपस्थित होते.




# डिजिटल व्यवहारामुळे सायबर सुरक्षेकडे लक्ष द्या

## उप जिल्हाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे; बुलडाणा तहसील कार्यालयात राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा

**दिव्य वतन /प्रतिनिधी**

बुलडाणा- डिजिटल व्यवहारांच्या वाढत्या वापरामुळे नागरिकांनी सायबर सुरक्षिततेकडे ही लक्ष द्यावे. ग्राहकांची फसवणूक रोखण्यासाठी प्रशासन सज्ज असून, तक्रार आल्यास तत्काळ दखल घेतली जाते, असे मार्गदर्शन उप जिल्हाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे यांनी केले. जिल्ह्यात प्रत्येक तहसील कार्यालयात आज राष्ट्रीय ग्राहक दिन पुरवठा विभागाच्या वतीने साजरा करण्यात आला. बुलडाणा येथेही बुलडाणा तहसील कार्यालयात राष्ट्रीय ग्राहक दिन विविध उपक्रमांच्या माध्यमातून उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास उपजिल्हाधिकारी तथा प्र जिल्हा पुरवठा अधिकारी डॉ. जयश्री ठाकरे मार्गदर्शन करत होते. यावेळी तहसीलदार विठ्ठल कुमरे, नायब तहसीलदार शशिकांत वाघ, अनंता पाटील यांच्यासह तहसील कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी व नागरिक उपस्थित होते. यावेळी उपजिल्हाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे यांनी ग्राहक संरक्षण कायद्याची माहिती देत, शासनाच्या विविध योजना व सुविधा ग्राहकांसाठी उपलब्ध असल्याचे सांगितले. तसेच तहसीलदार विठ्ठल कुमरे यांनी आपल्या मनोगतात ग्राहक व विक्रेते यांच्यात पारदर्शक व्यवहार होणे आवश्यक असल्याचे नमूद केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस तहसीलदार उर्मिला उरकुंडे यांनी प्रास्ताविक करताना राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा करण्यामागील उद्देश स्पष्ट केला.

तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. गायत्री सावजी यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी तुषार पाटील यांनी उपस्थित मान्यवर, अधिकारी, कर्मचारी व नागरिकांचे आभार मानले.

ग्राहकांच्या हिताच्या बाबींचे मार्गदर्शन ग्राहकांना कोणत्या सुविधा मिळतात, ग्राहकांनी कोठे व कशा प्रकारे तक्रारींचे निरसन करुन घ्यावयास पाहिजे. वस्तु खरेदी करताना त्यात आपली फसवणूक होत नाही ना, याची खात्री करुन घ्यायची, मुदत संपलेल्या वस्तूंबाबत सतर्कता बाळगावयास हवी, वस्तूंचे वजन मुळ पॅकेटवर दाखवल्याप्रमाणे आहे की नाही, याची पडताळणी करण्याचेही अधिकारी ग्राहकांना आहेत. असे ग्राहकांच्या हिताच्या बाबींचे मार्गदर्शन करण्यात आले.





# सुरजभैय्या यादव यांचा प्रामाणिकपणा सापडलेला मोबाईल केला परत

खामगांव :- एकनिष्ठा गौ सेवा रक्तसेवा फाउंडेशन संस्थापक सुरजभैय्या यादव हे नेहमी प्रमाणे सामान्य रुग्णालय खामगांव येथे गरजू रुग्णाला रक्ताची मदत करण्यासाठी गेले असता त्यांना काल दिनांक 24 डिसेंबर 2025 रोजी शासकीय ओपीडी मध्ये सकाळी 11:30 वाजता मोटोरोला कंपनीचा नवीन मोबाईल फोन अंदाजे 11,000 हजार रुपये किंमतीचा मिळाला त्यांनी मोबाईल धारकाचा सर्वत्र शोध घेतला त्या फोन वर एका तासा नंतर फोन आला मि गजानन शेटे बोलतो खामगांव येथील भैय्युजी महाराज प्रेरित सूर्योदय पारधी आदिवासी आश्रम शाळा अधीक्षक आज सामान्य रुग्णालयात. आश्रम शाळेचे काही विद्यार्थी यांना घेऊन आलो होतो माझा हा फोन हरवलेला आहे तुम्ही कोण बोलता असे विचारताच एकनिष्ठा गौ सेवा रक्तसेवा फाउंडेशन अध्यक्ष सुरजभैय्या यादव बोलतो तुमचा मोबाईल फोन माझ्या जवळ आहे तुम्ही मला प्रत्यक्ष भेटून तुमचा फोन घेऊन जा तुमचा फोन सुरक्षित आहे गजानन शेटे सर यांना नर्मदेश्वर शिव मंदिर सतीफैल येथे त्यांच्या स्वाधीन फोन देऊन सुरजभैय्या यादव यांनी पुन्हा एक दा माणुसकीचे दर्शन घडविले.

# तीन कन्यारत्नांच्या स्वागतासाठी गावभर जिलेबी वाटप

**दिव्य वतन /प्रतिनिधी**

वीरेगाव - मुलींची संख्या कमी होत आहे. त्यामुळे दोन दिवसांत चितळीपुतळी गावातील तीन कुटुंबांत मुली जन्मल्या. या मुलींचे उत्स्फूर्तपणे स्वागत व्हावे या उद्देशाने तिन्ही पित्यांनी गावभर जिलेबी वाटप केली. मुलींच्या जन्मदात्या वडिलांनी एकत्र येऊन या मुलींच्या जन्माचे उत्स्फूर्तपणे स्वागत केले. या उपक्रमाबद्दल सरपंच राजेंद्र वांजुळे यांनी या तिन्ही पित्यांचा गावात विशेष सत्कार केला.

वंशाचा दिवा म्हणून मुलगाच हवा या हव्यासापोटी गर्भातच कळी खुडण्याचे प्रकार घडत आहेत. असे असताना वंशाची पणती असलेल्या स्त्री जन्माचे स्वागत चक्क गावभर जिलेबी वाटून करण्यात आले. चितळीपुतळी येथील तीन युवकांनी एकत्र येऊन त्यांना दोन-दोन दिवसांच्या अंतराने झालेल्या मुलींचे स्वागत केले. सुदर्शन अशोक अकाशे, कपिल बाळकिसन पटणे, रवींद्र बाबुराव चोकनफळे अशी त्या मुलींच्या वडिलांची नावे आहेत. मुलीच्या स्त्री जन्माचे स्वागत हे स्त्री जन्माचे प्रतीक असलेल्या आनंद उत्सव साजरा करून गावात जिलेबी वाटप करण्यात आले. लेकींच्या गोडव्याचे गावभर कौतुक केले जात आहे. या वेळी गोदावरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष व सरपंच राजेंद्र वांजुळे यांनी या तिन्ही युवकांचे या आगळ्या वेगळ्या स्त्री जन्माच्या स्वागताबद्दल शाल पुष्पहार घालून सत्कार केला. वंशाचा दीपक म्हणून मुलगाच हवा असतो, जेणेकरून तो आपल्या म्हातारपणाची काठी होईल. आपला सांभाळ करेल अशी अपेक्षा त्यामागे असते. मात्र, अनेकांना मुलगी नको असते. कारण मुलगी झाली तर तिच्या लग्नाचा प्रचंड खर्च, हुंडा, पालनपोषणाचा खर्च, तिच्या शिक्षणात बिनकामाची गुंतवणूक अशी मानसिकता असायची. पण आता काळ बदलला आहे. मुलगी शिकू लागली, मुलांच्या खांद्याला खांदा देऊन आज ती प्रत्येक क्षेत्रात चमकू लागली .

# नाताळच्या सुट्टयांमुळे संतनगरी हाऊसफुल्ल

**दिव्य वतन /प्रतिनिधी**

शेगांव - श्री संत गजानन महाराजांचे मंदिरामुळे विदर्भ पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संतनगरी शेगावला गुरुवार, शनिवार,व रविवार रोजी ख्रिसमस निमित्त सलग सुट्टी तसेच दिवाळी सारखी नाताळ सणानिमित्त मुंबई पुणे यासह अन्य ठिकाणच्या शाळा महाविद्यालय ऑफिसेसला असणाऱ्या दीर्घकालीन सुट्ट्यांमुळे शेगावला श्रींचे दर्शनास मोठ्या प्रमाणावर भाविक गर्दी उसळली आहे. दरवर्षी शेगावला नाताळमध्ये श्रींचे दर्शनासाठी अनेक ठिकाणाहून भाविक भक्तांचा ओढा मोठ्या प्रमाणावर असतो. श्रींचे दर्शन तसेच आनंद सागर या आध्यात्मिक केंद्राचे अवलोकन करण्यासाठी शेगावला हे भाविक येतात. शेगाव येथे येणाऱ्या सर्व रेल्वेगाड्या, एस टी बसेसमधून मोठ्या प्रमाणात प्रवासी बाहेर पडताना दिसतात. यामुळे मंदिर परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले आहे. श्रींचे दर्शनासाठी भाविकांना सरासरी तीन तास व श्रीमुख दर्शनासाठी ४० मिनिटे अवधी लागत आहे. श्री संस्थानकडून भाविक भक्तांची गैरसोय होऊ नये यासाठी सर्वतोपरी काळजी घेण्यात येत आहे भाविकांसाठी एकेरी मार्ग करण्यात आला असून मंदिरामध्ये सकाळी १० ते ५ पर्यंत महाप्रसाद हजारो भाविकांनी लाभ घेतला आहे. त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणात निवास व्यवस्था वारकरी निवास, भक्त निवास विसावा , विहार या ठिकाणी करण्यात आली आहे. कोणत्याही प्रकारे भक्तांची गैरसोय होऊ नये याची पूर्ण काळजी श्री संस्थानकडून घेतली जात आहे. श्री संस्थांनचे पाकिगमध्ये मोठ्या प्रमाणावर भाविकांची वाहने शिस्तबद्ध उभी असल्याचे दिसून येत आहे .तर मंदिर परिसरात व खाजगी पाकिग सुद्धा हाऊस फुल झाले आहे.





## अस्थिर कारभार, अस्वस्थ जनता

महाराष्ट्र राज्य आज अनेक आघाड्यांवर अस्वस्थतेच्या वातावरणातून जात आहे. प्रशासन, अर्थकारण, शेतकरी प्रश्न, स्थानिक स्वराज्य संस्था, कायदा–सुव्यवस्था आणि न्यायप्रक्रिया—प्रत्येक पातळीवर प्रश्नांची रांग लागलेली आहे. विकासाच्या गप्पा आणि वास्तव यामधील दरी दिवसेंदिवस वाढत चालली असून, जनतेचा विश्वास व्यवस्थेवरून हळूहळू उडत चालल्याचे चित्र समोर येत आहे. राज्यातील अनेक नगरपालिकांमध्ये आणि महापालिकांमध्ये अंकेक्षण अहवालातून आर्थिक अनियमिततेचे प्रकार समोर येत आहेत. शासन निर्णय, न्यायालयीन आदेश आणि आर्थिक शिस्त यांना डावलून निधी खर्च केला जात असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थाच जर पारदर्शक नसतील, तर लोकशाहीचा पाया मजबूत राहील का, हा प्रश्न उपस्थित होतो. दुसरीकडे, शेतकरी अजूनही संकटातच आहे. अवकाळी पाऊस, कापूस व सोयाबीनचे घसरलेले दर, अपुरी विमा भरपाई आणि वेळेवर मदत न मिळाल्यामुळे शेतकरी आर्थिक कोंडीत सापडला आहे. कर्जमाफीच्या घोषणा केल्या जातात; मात्र प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी संथ आणि अपुरी असल्याची तक्रार शेतकऱ्यांकडून होत आहे. शहरी भागात सामान्य नागरिक वाढत्या करभाराने त्रस्त आहे. मालमत्ता कर, पाणीपट्टी, घरपट्टी यामध्ये सातत्याने वाढ होत असताना नागरिकांना मूलभूत सुविधा मात्र दर्जेदार मिळत नाहीत. न्यायालये आणि शासनाने दिलेल्या सवलती प्रत्यक्षात कागदावरच राहतात, आणि सामान्य माणूस कार्यालयांच्या फेऱ्यांत अडकतो—हीच आजची शहरी वास्तवता आहे. राज्यातील कायदा व सुव्यवस्थेचाही प्रश्न ऐरणीवर आला आहे. महिलांवरील अत्याचार, सायबर गुन्हे, आर्थिक फसवणूक आणि वाढती गुन्हेगारी ही चिंता वाढवणारी बाब आहे. गुन्हेगारांवर कारवाई होते, पण न्याय मिळायला होणारा विलंब हा व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत करणारा ठरतो. राजकारणातही स्थैर्याचा अभाव जाणवतो. सततचे आरोप–प्रत्यारोप, सत्तासंघर्ष आणि निवडणूककेंद्रित निर्णय यामुळे जनतेचे प्रश्न दुय्यम ठरत आहेत. शासन यंत्रणा ही राजकीय हेतूंवर चालते की लोकहितासाठी—हा प्रश्न नागरिकांना सतावत आहे. आज गरज आहे ती केवळ टीकेची नाही, तर जबाबदार, संवेदनशील आणि पारदर्शक प्रशासनाची. लोकशाहीमध्ये सत्ता ही सेवा करण्यासाठी असते, आदेश देण्यासाठी नव्हे. शासनाने जनतेच्या विश्वासाला प्राधान्य दिले नाही, तर अस्वस्थतेचे रूपांतर उद्या आंदोलनात होण्यास वेळ लागणार नाही. महाराष्ट्राने इतिहासात अनेक वेळा परिवर्तनाचे नेतृत्व केले आहे. आजही ते शक्य आहे—पण त्यासाठी राजकीय इच्छाशक्ती, प्रशासकीय शिस्त आणि जनतेशी प्रामाणिक संवाद आवश्यक आहे. अन्यथा 'समृद्ध महाराष्ट्र' ही संकल्पना केवळ घोषणांपुरतीच मर्यादित राहील.

## लोकशाहीला हरताळ, जबाबदारीला तिलांजली

शेगाव नगरपालिकेतील आर्थिक गैरव्यवहाराचा प्रकार हा केवळ एका चुकीचा किंवा प्रशासकीय हलगर्जीपणाचा विषय राहिलेला नाही, तर तो लोकशाही व्यवस्थेच्या मुळावर घाव घालणारा गंभीर प्रश्न बनला आहे. आधीच उपलब्ध असलेला शासनमान्य डेटा पुन्हा वापरून त्याच कामासाठी कोट्यवधी रुपयांची देयके अदा करणे, तेही शासनाची परवानगी नसताना, हा प्रकार म्हणजे जनतेच्या कररूप पैशाची उघड उधळपट्टी आहे. अंकेक्षण विभागाने या प्रकरणात थेट दोन कोटी रुपयांची वसुली पात्र रक्कम निश्चित केली, ही बाबच या व्यवहाराचे गांभीर्य अधोरेखित करते. विशेष म्हणजे हा सारा प्रकार उच्च न्यायालयाचे स्पष्ट आदेश, शासन निर्णय आणि आर्थिक शिस्त या सर्वांनाच डावलून करण्यात आला आहे. याला प्रशासकीय चूक म्हणायचे, की जाणीवपूर्वक केलेला आर्थिक गैरव्यवहार—हा प्रश्न आता जनतेसमोर उभा आहे. एकीकडे शेगावमधील नागरिक अवाजवी मालमत्ता कराविरोधात गेली अनेक वर्षे संघर्ष करत आहेत, न्यायालयाचे दरवाजे ठोठावत आहेत, तर दुसरीकडे नगरपालिका प्रशासन मात्र मनमानी पद्धतीने कर वसुली सुरूच ठेवत आहे. शास्ती माफी जाहीर असतानाही नागरिकांना विविध कारणांनी अडवणूक केली जात असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. हा विरोधाभास म्हणजे "जनतेसाठी कर, पण जनतेसाठीच न्याय नाही" अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. उच्च न्यायालयाने दिलेले आदेश हा कायद्याचा अंतिम शब्द असतो. मात्र शेगाव नगरपालिकेने न्यायालयीन आदेशांना धाब्यावर बसवून पुन्हा त्याच खाजगी कंत्राटदाराला काम देणे, हे संविधानिक मूल्यांवर थेट आव्हान देणारे कृत्य आहे. शासनाने GIS आधारित मालमत्ता कर प्रणाली केंद्रित पद्धतीने राबवण्याचा निर्णय घेतलेला असताना, स्थानिक पातळीवर स्वतंत्र व अनधिकृत प्रक्रिया राबवणे म्हणजे सत्तेचा गैरवापरच म्हणावा लागेल. या संपूर्ण प्रकरणात सर्वाधिक धक्कादायक बाब म्हणजे, तांत्रिक व प्रशासकीय मान्यता नाकारली गेल्यानंतरही स्वनिधीतून रक्कम अदा करण्यात आली. याचा अर्थ स्पष्ट आहे—"मान्यता नाही, पण पैसे देणारच" अशी धोकादायक मानसिकता प्रशासनात बळावत आहे. ही मानसिकता लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे.आज अंकेक्षण अहवालामुळे हा प्रकार समोर आला असला, तरी प्रश्न असा आहे की अंकेक्षण नसते तर हे सत्य कधी बाहेर आले असते का? यामुळे संपूर्ण नगरपालिका व्यवस्थेतील पारदर्शकतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे नि तपोवनाचे वाढते तापमान'



संत तुकाराम महाराज यांच्या "वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे" या अभंगातून झाडे, वेली आणि जंगलातील प्राणी हे आपले सगेसोयरे, आपले कुटुंबीय आहेत. कारण ते आपल्याला जगण्यासाठी आवश्यक असलेला प्राणवायू, निवारा आणि अन्न देतात. ते आपले मित्र आहेत आणि त्यांच्यामुळेच एकांतवास आणि आत्मचिंतन शक्य होते, असे संत तुकारामांनी म्हटले आहे. जो पर्यावरणाच्या रक्षणाचा आणि निसर्गाशी एकरूप होण्याचा संदेश देतो. तुकाराम महाराज म्हणतात की झाडे, वेली आणि वन्यजीव हे केवळ आजूबाजूचे घटक नाहीत, तर ते आपले सगेसोयरे आहेत, जे आपल्या जीवनासाठी आवश्यक आहेत. यातून वृक्षारोपण, जंगलसंपदा आणि पर्यावरणाचे रक्षण करण्याची शिकवण मिळते. जी छत्रपती शिवाजी महाराजांनीही 'गड तेथे आमराई' या घोषणेतून दिली. झाडे आणि पक्ष्यांच्या सुमधुर आवाजामुळे एकांत आवडतो, जिथे गुण-दोष न लागता मनाला शांती मिळते आणि आत्मचिंतन करता येते. सांगायचं तात्पर्य म्हणजे निसर्गातील सर्व घटकांना आपले मानून त्यांच्यासोबत प्रेमाने आणि आदराने राहण्याचा तसेच पर्यावरणाचे रक्षण करण्याचा संदेश देते.

वृक्षतोड आणि पर्यावरणाचा मुद्दा हा एक गंभीर जागतिक प्रश्न आहे, जिथे विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर होणारी झाडे तोडण्याने जैवविविधतेचा -हास होतो, हवामान बदल वाढतो, मातीची धूप होते, वन्यजीवांचा अधिवास नष्ट होते आणि स्थानिक पर्यावरणाचे संतुलन बिघडते, ज्यामुळे मानवी जीवन तथा संपूर्ण जीवसृष्टी धोक्यात येते. अनेकदा वृक्षारोपणच्या आश्वासनांनंतरही प्रत्यक्षात हे वृक्ष जगतातच असे नाही. म्हणून वृक्षतोडीचे परिणाम आणि उपाययोजनांवर गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे, असे अनेक अहवाल आणि घटनांमधून स्पष्ट होते. वृक्षतोड आणि पर्यावरण यांचा खूप जवळचा संबंध आहे. वृक्षतोडीमुळे पक्षी, प्राणी आणि सूक्ष्मजंतू नष्ट होतात नि स्थानिक समुदायांचे विस्थापन होते. ज्यामुळे संपूर्ण परिसंस्थेवर नकारात्मक परिणाम होतो आणि पर्यावरणाचा समतोल बिघडतो. कार्बन डायऑक्साइड शोषून घेणारी झाडे कमी झाल्याने जागतिक तापमान वाढते म्हणजेच हवामानात बदल होते. मातीची गुणवत्ता आणि पाणी धरून ठेवण्याची क्षमता कमी होते आणि पाण्याचे चक्र बिघडते अर्थात पावसाचे प्रमाण कमी-जास्त होते आणि पाणीटंचाई निर्माण होऊ शकते. तसेच हवा आणि पाणी प्रदूषणात वाढ होते. यासाठी बेकायदेशीर वृक्षतोडीवर नियंत्रण ठेवण्यासाठी कठोर कायद्यांची अंमलबजावणी आवश्यक आहे. 'एक झाड तोडले तर दहा लावू' अशा आश्वासनांऐवजी लावलेली झाडे जगतील याची खात्री करणे, स्थानिक समुदायांना वृक्ष संवर्धनात सहभागी करून घेऊन जागरूक करणे, नैसर्गिक संसाधनांचा जपून वापर करणे आणि शाश्वत विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचे नुकसान टाळणे आवश्यक असते. वृक्षतोड आणि पर्यावरणाचा मुद्दा हा केवळ झाडे तोडण्याचा नसून, मानवाच्या भविष्याशी आणि पृथ्वीच्या अस्तित्वाशी जोडलेला एक गंभीर प्रश्न आहे, ज्यावर तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. याच पार्श्वभूमीवर नाशिकमधील तपोवन सध्या वृक्षतोड आणि पर्यावरण संवर्धनावरून सुरू असलेल्या वादाभोवती फिरत आहे, ज्यात पर्यावरणप्रेमींनी कुंभमेळा आणि सांडपाणी प्रक्रिया केंद्राच्या नावाखाली होणा-या वृक्षतोडीला विरोध केला आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानंतरही ही प्रक्रिया सुरू असून महापालिका प्रशासनावर दबाव आहे. तर दुसरीकडे प्रशासनाकडून पर्यायी रोपे लावणे आणि विकासाच्या नावाखाली जागा ताब्यात घेण्यावरून चर्चा सुरू आहे. म्हणजेच तपोवन हे सध्या पर्यावरणाचे रक्षण आणि विकासाच्या गरजा यांच्यातील संघर्षाचे केंद्र बनले आहे, जिथे वृक्षतोड, नदीची स्वच्छता आणि जमिनीच्या वापरावरून मोठा वाद सुरू आहे. ज्यामुळे तपोवन हे सद्यस्थितीत चर्चेत आहे.

सांडपाणी प्रक्रिया केंद्र आणि कुंभमेळ्याच्या नावाखाली झालेल्या वृक्षतोडीमुळे पर्यावरणप्रेमींनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून वृक्षतोडीच्या बदल्यात लावलेल्या रोपांची स्थिती, कपिला नदीची स्वच्छता आणि प्रशासनाकडून होणा-या कार्यवाहीवर लक्ष केंद्रित करून 'तपोवन वाचवा' मोहीम तीव्र झाली आहे. ज्यात स्थानिक नागरिक, विद्यार्थी आणि तज्ज्ञांचा सहभाग आहे. सांडपाणी प्रक्रिया केंद्रासाठी वृक्ष तोडण्यावरून पर्यावरणप्रेमी आणि प्रशासनात संघर्ष सुरू आहे. तर दुसरीकडे कपिला नदीची स्वच्छता, ऐतिहासिक संवर्धनाचे मुद्दे आणि प्रशासकीय घडामोडी तथा कुंभमेळ्याची तयारी यावरही लक्षवेध आहे. पर्यावरणप्रेमींनी प्रशासनाला झाडे तोडण्याच्या निर्णयाबद्दल प्रश्न विचारले आहेत आणि वृक्षतोडीचा विरोध करत आहेत. या संदर्भात त्यांनी आयुक्तांना निवेदन दिले आहे. उच्च न्यायालयातही याचिका दाखल करण्यात आली आहे, ज्यामुळे परिस्थिती अधिक संवेदनशील झाली आहे. प्रशासनाकडून कुंभमेळ्याच्या तयारीच्या नावाखाली झाडे तोडल्याचा आरोप आहे, तर काही राजकीय नेते आणि पर्यावरणवादी संस्था यावर आवाज उठवत आहेत. कपिला नदीच्या स्वच्छतेच्या स्थितीबद्दलही पर्यावरणप्रेमी चिंता व्यक्त करत आहेत आणि यावर लक्ष देण्याची मागणी करत आहेत. तसेच तपोवन परिसरातील ऐतिहासिक वारसा आणि ठिकाणांचे संवर्धन करण्यावरही भर दिला जात आहे. तपोवन सध्या एका बाजूला विकासाच्या नावाखाली होणा-या वृक्षतोडीमुळे आणि दुस-या बाजूला पर्यावरण संरक्षणाच्या मागणीमुळे चर्चेत आहे. ज्यात स्थानिक नागरिक, पर्यावरणप्रेमी आणि प्रशासन यांच्यात समन्वय साधण्याचा प्रयत्न सुरू आहे.

सांडपाणी प्रक्रिया केंद्रासाठी प्रस्तावित १८२५ झाडे तोडण्यास परवानगी मिळाल्यानंतर पर्यावरणप्रेमींनी याला विरोध केला आहे. याबाबतीत स्थानिक पातळीवर असंतोष आहे आणि पर्यावरणप्रेमींनी उच्च न्यायालयाच्या निकालानंतरही याबाबत प्रश्न विचारले आहेत. 'तपोवन वाचवा' या मोहिमेअंतर्गत पर्यावरणप्रेमींनी बैठका घेऊन प्रशासनाला आव्हान दिले आहे. तज्ज्ञांची समिती नेमणे आणि ऐतिहासिक संदर्भ मिळवणे यांसारख्या मागण्या केल्या जात आहेत. नाशिक महानगरपालिका आयुक्त मनिषा खत्री यांच्याकडे याबाबत विचारणा करण्यात आली आहे. कपिला नदीच्या स्वच्छतेवर आणि पर्यावरणाच्या स्थितीवरही लक्ष दिले जात आहे. या संदर्भात राजकीय नेते आणि प्रशासनासोबतही चर्चा सुरू असून विकासाच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित केले जात आहे. तपोवन सध्या पर्यावरण संरक्षणाच्या लढाईचे केंद्र बनले आहे, जिथे विकास आणि निसर्गाच्या रक्षणादरम्यान संतुलन साधन्याचे आव्हान असून नागरिक आणि पर्यावरणप्रेमी प्रशासनाकडे पारदर्शकता आणि योग्य कृतीची मागणी करत आहेत. तपोवनातील वृक्षतोड सध्या न्यायालयीन स्थगितीच्या अधीन आहे, पण यावरुन पर्यावरण, विकास आणि स्थानिक परंपरा यांच्यातील संघर्ष तीव्र झाला आहे.

शब्दस्पर्शी-
**सुनील शिरपुरे**
कमळवेल्ली,यवतमाळ

# महान अर्थतज्ज्ञ, थोर विचारवंत, व्यासंगी व्यक्तिमत्व डॉ मनमोहन सिंग

भारताचे माजी पंतप्रधान डॉ मनमोहन सिंग यांची आज पुण्यतिथी. दोन वर्षापूर्वी २६ डिसेंबर २०२४ रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने महान अर्थतज्ज्ञ, थोर विचारवंत आणि व्यासंगी व्यक्तिमत्त्व हरपला. त्यांनी देशासाठी जे योगदान दिले देश कधीही ते विसरणार नाही. त्यांच्या निधनाने भारताची कधीही भरून न निघणारी हानी झाली आहे. आज भारताची अर्थव्यवस्था जगातील सर्वात वेगाने विकसित होणारी अर्थव्यवस्था मानली जाते. याचे सर्व श्रेय डॉ मनमोहन सिंग यांनाच जाते कारण तीस बत्तीस वर्षापूर्वी ते देशाचे अर्थमंत्री असताना देशाची अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी त्यांनी जे क्रांतिकारी निर्णय घेतले त्यामुळेच देशाची अर्थव्यवस्था सुदृढ झाली आहे.

डॉ मनमोहन सिंग हे रूढ अर्थाने राजकारणी नव्हते तरीही त्यांनी समर्थपणे दहा वर्ष देशाचे नेतृत्व केले. त्यांनी देशासाठी दिलेले योगदान खूप महत्वाचे आहे. २६ सप्टेंबर १९३२ रोजी एका गरीब कुटुंबात डॉ मनमोहन सिंग यांचा जन्म झाला. ते लहान असतानाच त्यांचे मातृ छत्र हरपले. घरची परिस्थिती हालाखीची असूनही त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. पंजाब विद्यापीठातून आपले उच्च शिक्षण पूर्ण केल्यावर त्यांनी १९५७ साली केंब्रिज विद्यापीठातून अर्थशास्त्र विषयातून पहिल्या श्रेणीत पदवी मिळवली. त्यानंतर त्यांनी १९६२ साली ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या नफिल्ड महाविद्यालयातून अर्थशास्त्र विषयात डी फिल ही पदवी संपादन केली. उच्च शिक्षण घेऊन ते मायदेशात परतल्या वर त्यांनी पंजाब विद्यापीठ तसेच दिल्ली स्कूल ऑफ इकोनॉमिक्समध्ये प्राध्यापक म्हणून सेवा केली. अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून त्यांनी अनेक विद्यार्थी घडवले. एक विद्यार्थीप्रिय प्राध्यापक अशी त्यांची ओळख होती. याच दरम्यान त्यांनी युएनसिटीडी सचिवालयात त्यांनी काम पाहिले. अर्थशास्त्रातील विद्वान व्यक्ती अशी त्यांची ख्याती जगभर पसरू लागली त्यामुळे १९७१ साली त्यांना वाणिज्य मंत्रालयाचे आर्थिक सल्लागार ही जबाबदारी देण्यात आली. पुढील वर्षी म्हणजे १९७२ साली त्यांची अर्थ मंत्रालयात प्रमुख आर्थिक सल्लगार म्हणून नेमणूक झाली. अर्थ विभागाचे प्रमुख सल्लागार म्हणून त्यांची कामगिरी उल्लेखनीय राहिली. पुढे त्यांनी अर्थ मंत्रालयाचे सचिव, नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, पंतप्रधानांचे आर्थिक सल्लागार, विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष अशा महत्वाच्या पदावर त्यांनी काम केले. १९८७ ते १९९० या काळात त्यांनी जिनिव्हा येथील साऊथ कमिशनचे सरचिटणीस म्हणून काम पाहिले.

१९९० पासून भारतीय राजकारणात अनेक मोठ्या घडामोडी घडत होत्या. राजकारण अस्थिर झाले होते. विश्वनाथ प्रताप सिंग यांचे सरकार पडले होते. चंद्रशेखर हे भारताचे पंतप्रधान बनले होते. भारताची अर्थव्यवस्था बिकट बनली होती. देश चालवण्यासाठी सरकारकडे पैसे नव्हते सरकारी तिजोरीत ठणठणाट होता म्हणून पंतप्रधान चंद्रशेखर यांनी देशाचे हजारो टण सोने जागतिक बँकेकडे गहाण ठेवले होते. केवळ भारतच नव्हे तर संपूर्ण जगातच आर्थिक मंदी आली होती. अनेक देश डबघाईला आले होते अशातच काँग्रेसने चंद्रशेखर यांचा पाठिंबा



काढून घेतल्याने लोकसभेच्या निवडणुका लागल्या होत्या. निवडणूक प्रचार दरम्यानच राजीव गांधी यांची हत्या झाल्याने काँग्रेसचे सूत्रे पी व्ही नरसिंह राव यांच्याकडे आली. त्या निवडणुकीत काँग्रेसने सर्वाधिक जागा जिंकल्याने नरसिंह राव पंतप्रधान बनले. पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेताच कॅबिनेट सचिव नरेश चंद्र यांनी त्यांना आठ पानांचा अहवाल दिला. या अहवालात देशाची आर्थिक स्थिती अत्यंत वाईट असल्याचे नमूद करण्यात आले होते. अशा परिस्थितीत राव यांना अशा चेहऱ्याची गरज होती जो आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि त्यांच्या विरोधकांना भारत आता जुन्या मार्गावर जाणार नाही असा संदेश देऊ शकेल. त्यांनी त्यावेळी त्यांचे सल्लागार पी सी अलेक्झांडर यांना विचारले की अर्थ मंत्रालयासाठी आंतरराष्ट्रीय मान्यता असलेल्या व्यक्तींचे नावे सुचवा तेंव्हा पी सी अलेक्झांडर यांनी आय जी पटेल व डॉ मनमोहन सिंग यांची नावे सुचवली. आय जी पटेल यांची आई आजारी असल्याने ते भारतात येऊ शकणार नाही मात्र डॉ मनमोहन सिंग यांना संपर्क केल्यास देशहीतासाठी ते अर्थमंत्री होतील असे पी सी अलेक्झांडर यांनी पंतप्रधानांना सांगितले. लगेचच नरसिंह राव यांनी डॉ मनमोहन सिंग यांच्याशी संपर्क केला आणि तुम्ही माझ्या मंत्रिमंडळात अर्थमंत्री होताल का ? असे विचारले. मनमोहन सिंग यांनी त्यास होकार दिला आणि डॉ मनमोहन सिंग भारताचे अर्थमंत्री बनले. अर्थमंत्री म्हणून त्यांनी अनेक क्रांतिकारी निर्णय घेतले. देशाची अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी त्यांनी खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण धोरण आणले. अर्थमंत्री म्हणून त्यांनी देशाची अर्थव्यवस्था सुधारलीच नाही तर ती वेगवान केली. त्या काळात डॉ मनमोहन सिंग यांना जागतिक पातळीवर सर्वोत्कृष्ट अर्थमंत्री म्हणून संबोधले जात असे. त्यांनी जागतिक बँकेकडे गहाण ठेवलेले सोने परत आणले. देशाच्या तिजोरीत भर घातली. देशात परदेशी गुंतवणूक आणली त्यामुळे देशाची अर्थव्यवस्था तर सुधारलीच पण तरुणांना रोजगार देखील मिळाला. त्यांच्या उदारीकरणाच्या धोरणाला जगाने मान्यता दिली म्हणूनच त्यांना जागतिक उदारीकरणाचे जनक असे म्हणतात. १९९६ साली काँग्रेसचे सरकार गेल्यावर ते राज्यसभेत विरोधी पक्षनेते बनले. मे २००४ साली झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला बहुमत मिळाले त्यावेळी सोनिया गांधी याच देशाच्या पंतप्रधान होतील असे सर्वांना वाटले पण सोनिया गांधींनी आपला आतला आवाज ऐकून पंतप्रधानपद नाकारले आणि डॉ मनमोहन सिंग यांची पंतप्रधानपदी निवड केली. त्यांच्या पंतप्रधानपदाच्या काळातही त्यांनी अनेक महत्वाचे निर्णय घेतले . देशातील एकही व्यक्ती उपाशी झोपू नये म्हणून त्यांनी अन्न सुरक्षा सारखे महत्वाचे विधेयक आणले. सर्वांना रोजगार मिळावे म्हणून त्यांनी मनरेगा योजना आणली. त्यांच्या पंतप्रधान काळात परराष्ट्राशी भारताचे सौहार्दाचे संबंध होते. त्यांच्याच काळात भारत आणि अमेरिका यांचे संबंध दृढ झाले. सर्वसामान्य जनतेच्या हिताचे अनेक निर्णय घेतल्यानेच जनतेने त्यांना दुसऱ्यांदा पंतप्रधान बनण्याची संधी दिली. २००४ ते २०१४ असे सलग दहा वर्ष ते भारताचे पंतप्रधान होते. सलग दहा वर्ष देशाचे पंतप्रधान राहूनही ते कायम नम्र आणि विनयशील राहिले. अहंकाराचा लवलेशही त्यांना शिवला नाही. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. अर्थशास्त्रावर आधारित ग्रंथ लीहले. त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले. त्यांना अनेक विद्यापीठांनी मानाची डॉक्टरेट दिली. देशाचा दुसरा सर्वोच्च पुरस्कार पद्मविभूषण त्यांना प्राप्त झाला. त्यांच्या निधनाने देशाने एक महान अर्थतज्ज्ञ, थोर विचारवंत, व्यासंगी व्यक्तिमत्त्व, अभ्यासक आणि थोर देशभक्त गमावला आहे. त्यांच्या कामाप्रती असलेला व्यासंगी आणि शैक्षणिक दृष्टिकोन, जनसामान्यांसाठी असलेली उपलब्धता व विनम्र आचारणामुळे ते कायम स्मरणात राहतील. डॉ मनमोहन सिंग यांना पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन!

***श्याम ठाणेदार***
दौंड जिल्हा पुणे

# वाहनांच्या संख्येत वाढ भारतासाठी चिंतेचा विषय

वाहनांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ मोठ्या प्रमाणात होत आहे. आकुंचन पावणाऱ्या रस्त्यांवरील वाहनांची वाढती संख्या चिंतेचा विषय बनत आहे. यामुळे केवळ शहरांमध्येच नव्हे तर ग्रामीण भागातही वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत आहे. वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे सामान्य लोकांची गैरसोय होत आहेच, शिवाय वाहतूक पोलिसांनाही सुरळीत वाहतूक राखण्यात मोठ्या अडचणी येत आहेत, ज्यामुळे वारंवार रस्ते अपघात होतात. वर्धा किल्याचे उदाहरण घेतले तर जिल्ह्यातील वाहनांची संख्या पाहिली तर, दरवर्षी १५,००० ते २०,००० नवीन वाहने रस्त्यावर येत आहेत. पूर्वी फक्त सायकली असलेल्यांकडे आता दुचाकी आहेत, तर पूर्वी दुचाकी असलेल्यांकडे आता कार आणि इतर वाहने आहेत. याचा अर्थ असा की, आज जिल्ह्यात असे एकही कुटुंब नाही ज्यांच्याकडे लहान असो वा मोठे, वाहन नाही.

आकुंचन पावणाऱ्या रस्त्यांवरील वाहनांची वाढती संख्या हा संपूर्ण भारतासाठी चिंतेचा विषय बनत आहे. यामुळे केवळ शहरांमध्येच नव्हे तर ग्रामीण भागातही वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत आहे. वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे जनतेची गैरसोय होत नाही तर वाहतूक पोलिसांसमोर सुरळीत वाहतूक राखण्याचे मोठे आव्हान निर्माण होते, ज्यामुळे वारंवार रस्ते अपघात होतात.

ज्यांच्याकडे पूर्वी फक्त सायकली होत्या त्यांच्याकडे आता दुचाकी आहेत, तर ज्यांच्याकडे पूर्वी दुचाकी होत्या त्यांच्याकडे आता कार आणि इतर वाहने आहेत. याचा अर्थ असा की आता असे एकही कुटुंब नसेल ज्याच्याकडे मोठे किंवा लहान वाहन नसेल. गेल्या कित्येक पवर्षापासून वाहनांची संख्या झपाट्याने वाढत आहे. त्या तुलनेत, बहुतेक शहरे आणि ग्रामीण भागातील रस्त्यांची रुंदी तशीच आहे. मुख्य रस्ते आणि महामार्गांची रुंदी लक्षणीयरीत्या वाढली असली तरी, आता वाहनांच्या संख्येपेक्षा रुंदी कमी होत चालली आहे. सर्वात मोठी चिंता म्हणजे लोक इतरांना पाहून वाहने खरेदी करत आहेत, परंतु सर्वांनाच योग्य ड्रायव्हिंग प्रशिक्षण मिळत नाही. त्यामुळेच वाढती वाहतूक कोंडी, बेपर्वा वाहन चालवणे आणि एकमेकांना मागे टाकण्याची स्पर्धा यामुळे रस्ते अपघात वाढत आहेत.

वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे वाढते रस्ते अपघात ही एक गंभीर समस्या बनत आहे, ज्याची मुख्य कारणे म्हणजे वाहतूक नियमांचे उल्लंघन, निष्काळजीपणा, मद्यपान करून वाहन चालवणे, लक्ष विचलित करणे (जसे की मोबाईल फोनचा वापर) आणि रस्ता सुरक्षेबद्दल जागरूकतेचा अभाव, ज्यामुळे दरवर्षी लाखो मृत्यू आणि आर्थिक नुकसान होते, विशेषतः तरुण आणि असुरक्षित घटक (पादचारी, दुचाकीस्वार) यांना याचा सर्वाधिक फटका बसतो आणि त्यासाठी कठोर कायदे, चांगल्या पायाभूत सुविधा आणि जनजागृतीची आवश्यकता असते.

भारतात वाहन अपघातात दररोज सरासरी ४६२ ते ४८५ लोक मृत्यू पावतात, म्हणजे दर तीन ते साडेतीन मिनिटांनी एकाचा मृत्यू होतो; २०२४ च्या आकडेवारीनुसार, हा आकडा १.७७ लाखांवर पोहोचला आहे, जो मागील वर्षापेक्षा वाढ दर्शवतो, ज्यामुळे एकूण अपघात आणि मृत्यूंच्या संख्येत वाढ झाली आहे.

वाहनांची वाढती संख्या ही दुधारी तलवार आहे, ज्यामुळे सोयीबरोबरच गंभीर आरोग्य आणि पर्यावरणीय आव्हानेही निर्माण होत आहेत, ज्यांचे निराकरण केवळ एकात्मिक धोरण आणि वैयक्तिक प्रयत्नांद्वारेच करता येईल.

वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे गंभीर आरोग्य आणि पर्यावरणीय समस्या उद्भवतात जसे की वायू प्रदूषण (श्वसन आणि हृदयरोग), रस्ते अपघात (मृत्यू आणि दुखापती) आणि वाहतूक कोंडी, ज्यामुळे हवेची गुणवत्ता खराब होते आणि लोकांच्या जीवनशैलीवर नकारात्मक परिणाम होतो, तथापि, चालणे आणि सायकलिंगला प्रोत्साहन दिल्याने या समस्या कमी होऊ शकतात आणि आरोग्य सुधारू शकते.

वाहनांमधून निघणाऱ्या वायूंमुळे (कार्बन मोनोऑक्साइड, नायट्रोजन ऑक्साईड आणि सूक्ष्म कण) दमा, ब्राँकायटिस, सीओपीडी, हृदयरोग आणि स्ट्रोक यांसारख्या आजारांचा धोका वाढतो. वाढत्या वाहनांच्या संख्येमुळे अपघातांमध्ये वाढ होते, विशेषतः भारतासारख्या देशांमध्ये, ज्यामुळे लाखो लोक मृत्युमुखी पडतात आणि जखमी होतात आणि तरुण लोकसंख्येसाठी ते मृत्यूचे एक प्रमुख कारण आहेत. जास्त वाहनांच्या संख्येमुळे वाहतूक कोंडी होते, ज्यामुळे प्रवासाचा वेळ आणि इंधनाचा वापर वाढतो. त्याच बरोबरमोटार वाहनांवर अवलंबून राहिल्याने चालणे आणि सायकल चालवणे कमी होते, ज्यामुळे लठ्ठपणा, मधुमेह आणि हृदयरोगाचा धोका वाढतो.

वाहनांच्या वायूमुळे फुफ्फुसांना त्रास, न्यूमोनिया आणि दम्याचा झटका येऊ शकतो.सूक्ष्म कण रक्तप्रवाहात प्रवेश करू शकतात आणि रक्तवाहिन्या (एथेरोस्क्लेरोसिस) मध्ये अडथळा निर्माण करू शकतात, ज्यामुळे हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोकचा धोका वाढतो. प्रदूषण आणि वाहतुकीचा ताण देखील मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम करतो.

वाहनांची वाढती संख्या, नियमांचे पालन न करणे आणि जागरूकतेचा अभाव यामुळे अपघात होत आहेत, ज्यांचे निराकरण करण्यासाठी बहुआयामी दृष्टिकोन आवश्यक आहे.

**प्रा डॉ सुधीर अग्रवाल** वर्धा
९५६१५९४३०६



दिव्य वतन हे दैनिक वृत्तपत्र प्रकाशक मालक मुख्य संपादक गोपाल आनंदराव कडुकर यांनी कार्यालय हाऊस नंबर १८ निवास सोसायटी स्वामी समर्थ मंदिर जवळ घोगली रोड बेसा तालुका जिल्हा नागपूर - ४४००३४ येथून प्रकाशित केले. संपर्क मो. ७७०९३७७५१०

## महत्त्वाचे...



### ओडिशातील 1 कोटी रुपयांचा बक्षीस असलेला नक्षलवादी ठार

वृत्तसंस्था : छत्तीसगडचे शेजारील राज्य ओडिशाच्या कंधमालमध्ये सुरक्षा दलांनी चकमकीत 6 नक्षलवाद्यांना ठार केले आहे. यामध्ये 1 कोटींहून अधिक बक्षीस असलेला सेंट्रल कमिटी मेंबर (CCM) गणेश उईके याचाही समावेश आहे. दोन महिला नक्षलवादीही मारल्या गेल्या आहेत. ठार झालेल्या नक्षलवाद्यांचे मृतदेह आणि शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत.सुरक्षा दलांना कंधमाल जिल्ह्यातील चाकापाड परिसरात नक्षलवाद्यांच्या उपस्थितीची माहिती मिळाली होती. याच माहितीच्या आधारे 23 पथकांना कारवाईसाठी पाठवण्यात आले होते. यामध्ये 20 स्पेशल ऑपरेशन्स ग्रुप (SOG), दोन सीआरपीएफ आणि एक बीएसएफ पथके समाविष्ट होती. ही कारवाई कंधमाल जिल्ह्यातील चाकापाड पोलिस स्टेशन क्षेत्र आणि गंजाम जिल्ह्यातील राम्भा वन क्षेत्रात राबवण्यात आली. आज म्हणजेच २५ डिसेंबर रोजी मोहिमेदरम्यान वेगवेगळ्या ठिकाणी माओवादी आणि SOG जवानांमध्ये अनेकदा गोळीबार झाला. चकमकीनंतर परिसरात शोधमोहीम राबवण्यात आली, ज्यात ५ नक्षलवाद्यांचे मृतदेह आढळले. यामध्ये ३ पुरुष आणि २ महिला आहेत. सर्व माओवादी गणवेशात होते.

### ख्रिसमसला कॅथेड्रल चर्चमध्ये गेले मोदी..



वृत्तसंस्था : देशभरात नाताळ साजरा केला जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी देखील नाताळनिमित्त गुरुवारी दिल्लीतील कॅथेड्रल चर्च ऑफ द रिडेम्पशनमध्ये नाताळच्या सकाळच्या प्रार्थनेत सहभागी झाले. या सेवेत प्रार्थना, कॅरोल झाले. तर दिल्लीचे बिशप रेव्ह डॉ. पॉल स्वरूप यांनी पंतप्रधान मोदींसाठी विशेष प्रार्थना केली. राहुल गांधी यांनीही एक व्हिडिओ पोस्ट करून नाताळ आणि नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

यापूर्वी, पंतप्रधानांनी नागरिकांना ख्रिसमसच्या शुभेच्छा दिल्या. त्यांनी X वर आणखी एका पोस्टमध्ये लिहिले- "सर्वांना शांतता, करुणा आणि आशेने भरलेल्या ख्रिसमसच्या शुभेच्छा. येशू ख्रिस्तांची शिकवण आपल्या समाजात सलोखा मजबूत करो. "गेल्या काही वर्षांपासून पंतप्रधान मोदी नियमितपणे ख्रिश्चन समुदायाशी संबंधित कार्यक्रमांमध्ये भाग घेत आहेत. 2023 मध्ये नाताळला त्यांनी दिल्लीतील त्यांच्या 7 लोक कल्याण मार्ग येथील निवासस्थानी एका कार्यक्रमाचे आयोजन केले होते.2024 मध्ये ते मंत्री जॉर्ज कुरियन यांच्या घरी रात्रीच्या जेवणासाठी गेले होते. तसेच कॅथोलिक बिशप्स कॉन्फरन्स ऑफ इंडियाच्या कार्यक्रमात देखील सहभागी झाले होते. सेंट फ्रान्सिस चर्चची ओळख त्याच्या आजच्या काळातील आकर्षणापेक्षाही जास्त आहे. जे लोक थांबून त्याच्या भिंतींकडे पाहतात त्यांना भव्य चित्रे पाहायला मिळतील. तथापि, फार कमी लोकांना माहिती आहे की या भिंतींवर कोरलेली कलाकृती ही एखाद्या सामान्य कलाकाराची नाही, तर दुसऱ्या महायुद्धातील युद्धकैदीची आहे.हा एक कैदी होता ज्याने तुरुंगात असूनही, कुंचला उचलला आणि देहरादूनवर आपल्या कलेची कायमची छाप सोडली.

# सैन्य जवानांना सोशल मीडिया वापरण्याची परवानगी

## इंस्टाग्रामवर कमेंट करण्यास मनाई; व्हॉट्सॲपवर मेसेज करू शकतील, 5 वर्षांपूर्वी बंदी घातली होती

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

भारतीय लष्कराने जवानांच्या सोशल मीडिया ॲप्सच्या वापराबाबत नवीन धोरण जारी केले आहे. इंस्टाग्रामवर रील्स, फोटो आणि व्हिडिओ पाहता येतील, मात्र कमेंट करण्याची परवानगी नाही.

व्हॉट्सॲप, टेलिग्रामसारख्या ॲप्सवर गोपनीय नसलेली माहिती शेअर करता येईल.

याशिवाय, यूट्यूब आणि X चा वापर केवळ माहितीसाठी केला जाईल. तसेच, लिंक्डइन, स्काईप आणि सिग्नल ॲपसाठीही नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्यात आली आहेत.

भारतीय लष्कराने गेल्या महिन्यात नवीन कोट कॉम्बॅटच्या डिझाइनचे (डिजिटल प्रिंट) पेटंट घेतले होते. हा त्रि-स्तरांचा गणवेश सैनिकांसाठी प्रत्येक हवामानात आरामदायक आहे. म्हणजेच, लष्कराच्या परवानगीशिवाय कोणीही या डिझाइनचा गणवेश बनवू शकणार नाही, विकू शकणार नाही किंवा वापरू शकणार नाही. असे केल्यास कायदेशीर कारवाई आणि दंड आकारला जाईल.

हा नवीन कोट कॉम्बॅट नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी (निफ्ट), दिल्लीने आर्मी डिझाइन ब्युरोसोबत तयार केला आहे. लष्कराने जानेवारी 2025 मध्ये नवीन कॉम्बॅट गणवेश सादर केला होता.

गृह मंत्रालयाने बॉर्डर सिक्युरिटी फोर्स (BSF) मध्ये कॉन्स्टेबल भरतीसाठी माजी अग्निवीरांसाठी आरक्षण 10% वरून 50% पर्यंत वाढवले आहे. या संदर्भात 18 डिसेंबर रो जी एक राजपत्र अधिसूचना (गजट नोटिफिकेशन) जारी करून मा हिती दिली आहे. सरकारने 'बॉर्डर सिक्युरिटी फोर्स, जनरल ड्युटी कॅडर (नॉन-गजेटेड) रिक्रूट में ट रूल्स, 2015' मध्ये बदल केले आहेत.




# नायलॉन मांजावर 'संक्रांत':हायकोर्टाची जिल्हाधिकाऱ्यांना सूचना

## वापरणाऱ्यांना 50 लाखांचा तर विक्रेत्यांवर अडीच लाखांच्या दंड!

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**



देशभरात सर्वत्र मकर संक्रांत उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. संक्रांत सण जवळ आला की आकाशात पतंगांची अक्षरशः गर्दी दिसायला लागते. मात्र, हा पतंग उडवण्यासाठी नायलॉन दोऱ्याचा वापर गेल्या काही वर्षात वाढला असून यामुळे अनेक अपघात घडत असल्याचे समोर आले आहे. नायलॉन मांजामुळे अनेकांचे गळे देखील चिरल्याच्या घटना घडत आहेत. या नायलॉन मांजाच्या विरोधात नागरिकांनी आता थेट न्यायालयात धाव घेतली आहे. न्यायालयाने देखील याची गंभीर दखल घेत महत्त्वाचा निर्णय दिला आहे.

न्यायालयाने नायलॉन मांजा प्रकरणी गंभीर दखल घेत नागरिकांच्या सूचना व हरकती मागवल्या आहेत. अन्यथा नायलॉन मंजाचा वापर करणाऱ्या मुलांच्या पालकांना आणि विक्री करणाऱ्यांना मोठ्या दंडाची शिक्षा सुनावली जाणार आहे. तसेच या संदर्भात गृह विभागाच्या सर्वच जिल्हाधिकारी कार्यालयांना पत्रे पाठवली आहेत. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने प्राणघातक नायलॉन मांजा विकणाऱ्यांवर अडीच लाख आणि वापरणाऱ्यांवर 50 हजार रुपये दंड ठोठावण्याच्या सूचना विदर्भातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या आहेत.नायलॉन मांजाच्या वाढत्या वापरामुळे उद्भवणाऱ्या धोक्यांची दखल घेत, न्यायालयाने 2021 मध्ये स्वतःहून दाखल करून घेतलेल्या जनहित याचिकेवर न्यायमूर्तींच्या खंडपीठासमोर सुनावणी पार पडली. गेल्या तीन वर्षांत परिस्थितीत कोणताही समाधानकारक बदल न झाल्याबद्दल न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर, नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्यांवर आणि तो वापरून पतंग उडवणाऱ्यांवर आता कठोर कायदेशीर कारवाई करण्याचा ठाम निर्धार न्यायालयाने व्यक्त केला असून प्रशासनाला त्याबाबतचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना 27 डिसेंबर रोजी सर्व वर्तमानपत्रांच्या मुखपृष्ठावर जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या नोटीसद्वारे दंडात्मक कारवाईचा इशारा देण्यात येणार असून, नायलॉन मांजा वापरणारा मुलगा अल्पवयीन असल्यास त्याच्या पालकांना आणि सज्ञान असल्यास संबंधित व्यक्तीला 50 हजार रुपये, तर म यांना अडीच लाख रुपय का ठोठावण्यात येऊ नये, अशी विचारणा केली जाणार आहे. संबंधितांना सुनावणीची संधी देऊन ही दंडात्मक कारवाई केली जाणार असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. न्यायालयाने नायलॉन मांजाप्रकरणी आता पोलिस प्रशासनाची जबाबदारी निश्चित केली असून, ज्या क्षेत्रात अशा प्रकारची अनुचित घटना घडेल, त्या भागातील संबंधित पोलिस अधिकाऱ्यांवरही कठोर कारवाई करण्याचे निर्देश पोलिस आयुक्त आणि पोलिस अधीक्षकांना दिले आहेत. या आदेशानुसार, 29 डिसेंबरपूर्वी सर्व पोलिस उपायुक्त व इतर संबंधित अधिकाऱ्यांना या कारवाईबाबत रीतसर सूचना देण्यात याव्यात आणि अशी कारवाई का केली जाऊ नये, याबाबत त्यांचे काही आक्षेप असल्यास त्यांना न्यायालयात आपली बाजू मांडण्याची संधी दिली जावी, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

# शहा म्हणाले- मुख्यमंत्री मोहन यांची कार्यशैली शिवराज यांच्यापेक्षाही ऊर्जावान

## ग्वाल्हेरमध्ये पोलिसांनी लोकांकडून काळे कपडे काढून घेतले; तरीही काँग्रेसने काळे झेंडे दाखवले

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**



ग्वाल्हेर/रीवा- केंद्रीय गृहमंत्री अमित शहा गुरुवारी मध्य प्रदेशच्या दौऱ्यावर होते. शहा यांनी ग्वाल्हेरमध्ये अभ्युदय मध्य प्रदेश ग्रोथ समिट आणि रीवा येथे कृषक संमेलनात भाग घेतला.

शहा आणि मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांनी ग्वाल्हेरच्या मेळा ग्राउंडमध्ये राज्यस्तरीय `अभ्युदय मध्य प्रदेश ग्रोथ समिट: गुंतवणुकीतून रोजगार`, ग्वाल्हेर व्यापार मेळा आणि अटल म्युझियमचे उद्घाटन केले. 2 लाख कोटी रुपयांच्या 1655 औद्योगिक युनिट्सचे भूमिपूजन आणि लोकार्पणही केले.

यावेळी शहा यांनी मुख्यमंत्री मोहन यादव यांच्या कार्यशैलीला माजी मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्यापेक्षा अधिक ऊर्जावान असल्याचे सांगितले. शहा म्हणाले - दिग्विजय सिंह यांच्या राजवटीत मध्य प्रदेश एक आजारी राज्य बनले होते. शिवराजजींनी राज्यावरून आजारी राज्याचा टॅग हटवला आणि आता मोहन यादवजी, शिवराजजींपेक्षा अधिक ऊर्जेने हे पुढे नेण्याचे काम करत आहेत.

येथे शहा यांनी केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांना राजासाहेब म्हणून संबोधले तेव्हा लोकांनी जोरदार टाळ्या वाजवल्या.

शहा आणि मुख्यमंत्र्यांना ऐकण्यासाठी काळे जॅकेट आणि स्वेटर घालून आलेल्या लोकांना कार्यक्रमस्थळाबाहेरच ते काढून टाकायला लावले. असे असूनही, काँग्रेसच्या महिला कार्यकर्त्या शहा यांना काळे झेंडे दाखवण्यात यशस्वी ठरल्या.

अटलजींनी आदिवासींच्या हक्कांना बळकटी दिली.

शहा म्हणाले- ग्वाल्हेरची भूमी सामान्य नाही. हीच ती भूमी आहे, जिथे तानसेनचा जन्म झाला. याच भूमीने अटलबिहारी वाजपेयींसारखा महान नेता देशाला दिला. येथूनच बाहेर पडून अटलजींनी संघर्ष केला आणि आज संपूर्ण देश त्यांना प्रेम करतो.

शहा म्हणाले की, मध्य प्रदेशात देशातील सर्वात मोठी आदिवासी लोकसंख्या आहे.

# थरूर म्हणाले- बेकायदेशीर स्थलांतरितांवर सरकारची कारवाई योग्य

## जर कोणी बेकायदेशीरपणे राहत असेल तर त्यालाही बाहेर काढण्याचा हक्क

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**



काँग्रेस खासदार शशी थरूर यांनी गुरुवारी देशात बेकायदेशीरपणे राहणाऱ्या लोकांविरुद्ध (अवैध स्थलांतरित) सरकारच्या कारवाईला पाठिंबा दिला. ते म्हणाले की, देशाच्या सीमांचे संरक्षण करणे आणि स्थलांतर व्यवस्था (इमिग्रेशन सिस्टीम) योग्यरित्या सांभाळणे ही सरकारची जबाबदारी आहे.

थरूर म्हणाले की, जर भारतात घुसखोरी होत असेल किंवा लोक व्हिसाची मुदत संपल्यानंतरही राहत असतील, तर हे प्रणालीचे अपयश आणि सीमा व स्थलांतर नियंत्रणातील त्रुटी दर्शवते. त्यांना कायद्यानुसार कठोरपणे बाहेर काढले पाहिजे.काँग्रेस खासदार म्हणाले की, जर लोक बेकायदेशीरपणे देशात येऊ शकत असतील, तर हे आपले अपयश नाही का? म्हणून सरकारने सीमेवर अधिक कठोरता दाखवली पाहिजे. नियम मोडणाऱ्यांवर कारवाई करण्याचा सरकारला पूर्ण अधिकार आहे.थरूर म्हणाले- शेख हसीना यांना भारतात राहू देणे योग्य निर्णय

काँग्रेस खासदारांनी सांगितले की, कायद्याचे पालन करणे आवश्यक आहे, परंतु बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांना भारतात राहू देण्याचा निर्णय माणुसकीची भावना दर्शवतो. त्यांनी सांगितले की, त्यांना जबरदस्तीने परत न पाठवणे हे योग्य पाऊल होते, कारण भारतासोबत त्यांचे जुने आणि विश्वासार्ह संबंध आहेत.

एखाद्याला देशातून बाहेर काढणे (डिपोर्टेशन) किंवा दुसऱ्या देशाला सोपवणे (एक्सट्रॅडिशन) हे निर्णय सोपे नसतात, कारण यात अनेक कायदेशीर नियम, आंतरराष्ट्रीय करार आणि अपवाद समाविष्ट असतात.

फार कमी लोकांना हे कायदेशीर मुद्दे आणि आंतरराष्ट्रीय करार पूर्णपणे समजतात, म्हणून अशा प्रकरणांमध्ये सरकारला विचारपूर्वक निर्णय घेण्याचा अधिकार दिला पाहिजे.

जोपर्यंत कायदेशीर प्रकरणांची चौकशी सुरू आहे, तोपर्यंत एखाद्याला संरक्षण देणे हे एक योग्य आणि जबाबदार पाऊल आहे. भारत एका चांगल्या मित्राचे आदरातिथ्य करत आहे, म्हणून सरकारने पूर्ण चौकशी होईपर्यंत त्याला सुरक्षित राहू दिले पाहिजे.

काँग्रेस खासदार शशी थरूर गेल्या काही महिन्यांपासून पक्षाच्या अधिकृत भूमिकेपेक्षा वेगळी विधाने करून चर्चेत आहेत. त्यांच्या अलीकडील विधानांमध्ये केंद्र सरकारच्या परराष्ट्र धोरणाचे आणि काही विरोधी राज्यांच्या धोरणांचे कौतुक समाविष्ट आहे, ज्यामुळे पक्ष नेतृत्व अनेकदा अस्वस्थ झाले आहे.

30 नोव्हेंबर रोजी संसदेच्या हिवाळी अधिवेशनासंदर्भात सोनिया गांधींच्या नेतृत्वाखाली बैठक झाली होती. थरूर यांनी काँग्रेसच्या स्ट्रॅटेजिक ग्रुपची ही महत्त्वाची बैठक अटेंड केली नव्हती.थरूर यांनी 4 नोव्हेंबर रोजी भारताच्या घराणेशाहीच्या राजकारणावर टीका करताना एका लेखात म्हटले होते की, भारतात राजकारण कौटुंबिक व्यवसाय बनले आहे.

# खालिदा झिया यांचे सुपुत्र 17 वर्षांनी बांगलादेशात परतले

## ढाका एअरपोर्टवर एक लाख कार्यकर्ते गोळा झाले, पंतप्रधानपदाचे दावेदार

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**



बांगलादेशच्या माजी पंतप्रधान खालिदा झिया यांचे पुत्र तारिक रहमान १७ वर्षांनी देशात परतले आहेत. अटक टाळण्यासाठी ते २००८ मध्ये लंडनला पळून गेले होते. त्यावेळी हसिना सरकारच्या काळात त्यांच्यावर अनेक भ्रष्टाचाराचे खटले प्रलंबित होते.

तारिक यांच्या स्वागतासाठी त्यांच्या पक्षाचे, बीएनपीचे १,००,००० हून अधिक कार्यकर्ते जमले होते. त्यांनी ढाका विमानतळ ते ३०० फूट रोड पर्यंत रोड शो केला. १३ किलोमीटरचा हा मार्ग पार करण्यासाठी त्यांना तीन तास लागले.

तारिक यांनी ३०० फूट रोडवर १७ मिनिटांचे भाषण दिले, त्यादरम्यान त्यांनी देशात शांतता प्रस्थापित करण्याचे आणि नवीन बांगलादेश निर्माण करण्याचे जाहीर केले. तथापि, त्यांनी शेख हसीनांचा उल्लेख केला नाही.

बांगलादेशात पुढील वर्षी १२ फेब्रुवारी रोजी सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत. खालिदा झिया यांच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे, रहमान पुढील पंतप्रधानपदाचे दावेदार असू शकतात असे मानले जाते.तारिक रहमान म्हणाले की, काही वर्चस्ववादी शक्तींचे एजंट अजूनही बांगलादेशविरुद्ध कट रचत आहेत.तारिक यांनी तरुणांना देशाला पुढे नेण्याची जबाबदारी घेण्याचे आवाहन केले. बांगलादेशची पुनर्बांधणी लोकशाही पायावर आणि मजबूत आर्थिक पायावर आधारित असावी असे ते म्हणाले.

गर्दीला संबोधित करताना त्यांनी शरीफ उस्मान बिन हादी यांच्या अलिकडेच झालेल्या हत्येचा उल्लेख केला आणि त्यांचे वर्णन एक धाडसी सदस्य म्हणून केले.तारिक म्हणाले की, हादी, १९७१ मध्ये मारले गेलेले आणि हुकूमशाही काळात जबरदस्तीने बेपत्ता आणि मारले गेलेले यांचे रक्त वाया जाऊ देऊ नये.

बांगलादेशचे राजकारण दोन नेत्यांभोवती फिरत राहिले आहे: अवामी लीगच्या शेख हसीना आणि बीएनपीच्या खालिदा झिया. १९८० च्या दशकात बांगलादेशात लष्करी राजवट होती. हसीना आणि खालिदा यांनी लष्करी राजवटीविरुद्ध रस्त्यावर एकत्र निदर्शने केली.

१९९१ मध्ये खालिदा झिया यांच्या निवडणूक विजयानंतर, खालिदा आणि शेख हसीना यांच्यातील राजकीय स्पर्धा वाढली. १९९० नंतर, बांगलादेशात जेव्हा जेव्हा निवडणुका होत असत तेव्हा सत्ता खालिदा झिया किंवा शेख हसीना यांच्याकडे जात असे. माध्यमांनी याला "बेगमांची लढाई" म्हटले.

# दिल्लीत 5 रुपयांत मिळेल जेवण, अटल कॅन्टीन सुरु

## 100 ठिकाणी स्टॉल लागतील, प्रत्येक स्टॉलमध्ये 500 लोकांसाठी जेवणाची सोय

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**







दिल्ली सरकारने माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या १०१ व्या जयंतीनिमित्त 'अटल कॅन्टीन' योजनेची सुरुवात केली.

या योजनेअंतर्गत शहरात १०० ठिकाणी ५ रुपयांत एक प्लेट जेवण मिळेल. प्रत्येक कॅन्टीनमध्ये सुमारे ५०० लोकांना जेवण उपलब्ध करून दिले जाईल.

दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता म्हणाल्या, अटल कॅन्टीन दिल्लीचा आत्मा बनेल, हे असे ठिकाण असेल जिथे कोणालाही उपाशी झोपावे लागणार नाही.

मुख्यमंत्र्यांनी अटल कॅन्टीनला भेट दिली, जिथे त्यांनी जेवण वाढणाऱ्या आणि जेवण करणाऱ्या लोकांशी संवाद साधला. संवादादरम्यान लोकांनी सांगितले की, 5 रुपयांमध्ये असे स्वादिष्ट आणि पौष्टिक जेवण मिळणे ही मोठी गोष्ट आहे. दिल्ली सरकारचा हा उपक्रम गरीब आणि मजुरांसाठी संजीवनीपेक्षा कमी नाही.

या योजनेचा उद्देश गरीब, मजूर आणि कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांना सन्मानाने भोजन उपलब्ध करून देणे हा आहे.

सरकारने दिल्लीतील विविध भागांमध्ये, ज्यात आरके पुरम, जंगपुरा, शालीमार बाग, ग्रेटर कैलाश, राजौरी गार्डन, नरेला, बवाना यांचा समावेश आहे, अशा 45 अटल कॅन्टीनची सुरुवात केली आहे. उर्वरित 55 कॅन्टीनचे उद्घाटन येत्या काही दिवसांत केले जाईल. या कॅन्टीनमध्ये दररोज दोन वेळा जेवण दिले जाईल.

कॅन्टीन दोन शिफ्टमध्ये चालेल. पहिल्या शिफ्टमध्ये सकाळी 11 वाजल्यापासून ते संध्याकाळी 4 वाजेपर्यंत लोक जेवण करू शकतील.

तर दुसऱ्या शिफ्टमध्ये संध्याकाळी 6:30 वाजल्यापासून ते रात्री 9:30 वाजेपर्यंत कॅन्टीन उघडी राहील. जेवणाच्या थाळीमध्ये डाळ, भात, चपाती, हंगामी भाजी आणि लोणचे यांचा समावेश आहे.

दिल्ली सरकारने जेवण वाटण्यासाठी मॅन्युअल कूपनऐवजी डिजिटल टोकन प्रणाली सुरू केली आहे. सर्व केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे पाळत ठेवली जाईल, ज्याचे दिल्ली अर्बन शेल्टर इम्प्रूव्हमेंट बोर्ड (DUSIB) च्या डिजिटल प्लॅटफॉर्मवरून रिअल-टाइममध्ये निरीक्षण केले जाईल.

फॅशन...

# भक्तिगीत गायल्याने बंगाली गायिकेशी गैरवर्तन




बंगाली गायिका लग्नजिता चक्रवर्ती यांना कोलकाता येथे एका खाजगी कार्यक्रमात भक्तिगीत गायल्यामुळे शारीरिक छळाला सामोरे जावे लागले आहे. गायिकेचा दावा आहे की कार्यक्रमात त्यांना तोंडी शिवीगाळही करण्यात आली.न्यूज एजन्सी एएनआयशी बोलताना लग्नजिता यांनी सांगितले की, 'देवी चौधरीरानी' चित्रपटातील भक्तिगीत 'जागो मां' गायल्यानंतर कार्यक्रमाच्या आयोजकांपैकी एकाने त्यांना मारण्याच्या उद्देशाने त्यांच्यावर हल्ला केला.

या संपूर्ण प्रकरणात गायिकेने भगवानपूर पूर्व पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती, त्यानंतर कारवाई करत पुरबा मेदिनीपूर पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. प्रकरणाचा सध्या तपास सुरू आहे.

कार्यक्रमादरम्यान जे काही घडले, त्याबद्दल सांगताना लग्नजिता म्हणते- 'मी माझा शो संध्याकाळी सुमारे 7 वाजता सुरू केला होता आणि सर्व काही व्यवस्थित सुरू होते. सुमारे 7:45 वाजेपर्यंत मी 7 गाणी गायली होती. माझे सातवे गाणे 'जागो मां' होते, जे 'देवी चौधरीरानी' चित्रपटातील आहे, जे याच पूजेदरम्यान प्रदर्शित झाले होते.या गाण्यानंतर जेव्हा मी प्रेक्षकांशी संवाद साधत होते, तेव्हा अचानक मी पाहिले की प्रेक्षकांमधून एक माणूस स्टेजकडे धावत आला. तो माझ्या चेहऱ्याच्या अगदी जवळ आला.'

त्यांनी पुढे म्हटले - 'मी ज्या शाळेत सादरीकरण करत होते, ते माझ्या संपूर्ण मैफिलीचे रेकॉर्डिंग करत होते. जी एक सामान्य गोष्ट आहे, कारण प्रत्येक आयोजक असेच करतो. पण माझ्याकडे त्या व्हिडिओ रेकॉर्डिंगचा प्रवेश नाही, कारण ती शाळेची मालमत्ता आहे. जर कोणाला तो व्हिडिओ मिळाला आणि तो सार्वजनिक झाला, तर प्रत्येकजण पाहू शकेल की महबूब मलिक मला मारण्याच्या इराद्याने मंचाकडे धावला होता. सरळ शब्दांत सांगायचे तर, तो मला मारहाण करू इच्छित होता. जेव्हा लोक मला वाचवण्यासाठी धावले आणि त्याला दूर ओढत होते, तेव्हा तो ओरडला, "जागो माँ खूप झाले, आता काही सेक्युलर गाणे गा.'

## ना पैसा ना वेळ, काहीही खर्च न करता मृणाल ठाकूर लांब केसांसाठी करते हा सोपा उपाय



चित्रपटसृष्टीत अभिनेत्रींच्या केसांच्या स्टाईल्स नेहमीच चर्चेत असतात. रेड कार्पेट लूक असो वा चित्रपटातील एखादा खास सीन, अनेक अभिनेत्री केसांना भर देण्यासाठी एक्सटेंशन वापरतात. कारण सततच्या स्टाईलिंगमुळे त्यांचे केस पातळ होतात आणि नैसर्गिक दाटपणा कमी होतो. मात्र या सगळ्यांपेक्षा वेगळी ठरते ती म्हणजे मृणाल ठाकूर. नैसर्गिक लांब आणि दाट केस असलेली ही अभिनेत्री सांगते की तिला एक्सटेंशनची अजिबात गरज पडत नाही.अलीकडेच दिलेल्या मुलाखतीत तिने केसांच्या आरोग्यासाठीचा स्वतःचा खास उपाय शेअर केला आणि तो व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. मृणालचा हा घरगुती आणि सोपा उपाय कोणालाही सहज करता येईल. जाणून घेऊया तिच्या चमकदार केसांचं रहस्य.मृणाल ठाकूरचं मत आहे की बाजारातील कितीही महागडी उत्पादने वापरली तरी बदामाच्या तेलासारखं परिणामकारक काही नाही. बदामाच्या तेलात केसांसाठी आवश्यक असलेले व्हिटॅमिन्स, फॅटी ॲसिड्स आणि अँटिऑक्सिडंट्स मुबलक प्रमाणात असतात. हे केसांच्या मुळांना पोषण देऊन त्यांना दाट आणि मजबूत बनवतं. ती स्वतः आठवड्यातून एकदा बदाम तेलाचा खास लेप लावते, ज्यामुळे केस गळणे कमी होते आणि त्यांची वाढ वेगाने होते.

मृणाल एका वाटीत दोन चमचे बदाम तेल घेते. त्यात एक चमचा ॲलोव्हेरा जेल आणि एका व्हिटॅमिन ई कॅप्सूलचं तेल मिसळते. हे मिश्रण नीट ढवळून केसांच्या मुळाशी हलक्या हाताने मालिश करते. सुमारे एका तासानंतर केस धुऊन टाकते. नियमित वापरल्याने केसांना पोषण मिळतं, ते मऊसर आणि दाट होतात. केसांच्या वाढीसाठी हा उपाय अतिशय प्रभावी ठरतो, असं ती सांगते.

## त्या रात्री मी थरथर कापत होते.. शोएबपासून घटस्फोट घेतल्यानंतर सानियाने शेअर केल्या भावना



घटस्फोटानंतरचे आयुष्य बाहेरून जितके सहज दिसते, तितके प्रत्यक्षात नसते. एकटं राहण्याचा निर्णय, जबाबदाऱ्या स्वतःच्या खांद्यावर घेणे आणि मुलांची काळजी एकट्याने पाहणे. या सर्वांचा भावनांवर आणि आरोग्यावर खोल परिणाम होऊ शकतो. सानिया मिर्झालाही अशाच तणावाचा सामना करावा लागला. फराह खानसोबतच्या एका मुलाखतीत सानिया म्हणाली, "मी कॅमेऱ्यासमोर हे सांगू इच्छित नव्हते, पण एक असा क्षण होता जो माझ्या आयुष्यातील सर्वात कठीण क्षणांपैकी एक होता." शूटिंगदरम्यान आलेल्या तिच्या पॅनिक अटॅकबद्दल बोलताना तिने मानसिक तणाव किती तीव्र होऊ शकतो हे स्पष्ट केले. घटस्फोटानंतर सानियाने काय अनुभवलं आणि अशा कठीण प्रसंगातून कोणत्याही व्यक्तीने स्वतःला कसं सावरावं याबद्दल पुढे सविस्तर जाणून घेऊया. ही गोष्ट खूप कठीण असली तरी तुम्ही काही गोष्टी करून या गोष्टीवर मात मिळवू शकता. घटस्फोट हा फक्त एक कायदेशीर टप्पा नसतो तर तो भावनांना हलवणारा, आयुष्याचा दिशा बदलणारा मोठा अनुभव असतो. ज्या व्यक्तीसोबत आपण स्वप्ने रंगवली, रोजच्या क्षणांत आनंद शोधला, ती साथ अचानक संपली की मनात एक खोल पोकळी निर्माण होते. तरीदेखील, हा काळ फक्त दुःखाचाच नसतो; हा स्वतःला पुन्हा ओळखण्याची, आयुष्य नव्याने घडवण्याची संधीही असते. वेदना नक्कीच टाळता येत नाही, पण हीच वेदना पुढच्या वाटेवरचे धैर्य, शिकवण आणि नवीन सुरुवातीची ऊर्जा देऊ शकते.अशा कठीण काळात स्वतःला दोष न देता, काही गोष्टी शांतपणे पाळणे महत्त्वाचे योग्य निर्णय, सकारात्मक विचार आणि थोडासा संयम तुम्हाला या भावनिक वादळातून बाहेर येण्यास मदत करू शकतात.

# बायकोच्या ट्रोलर्सना गौरव खन्नाचे उत्तर...

### आम्ही दोघेही आमच्या आयुष्यात आनंदी, डान्स व्हिडिओमुळे आकांक्षा ट्रोल झाली होती





अलीकडेच बिग बॉस 19 चा विजेता गौरव खन्नाची पत्नी आकांक्षा चमोलाचा एक डान्स व्हिडिओ व्हायरल झाला होता. आकांक्षाला तिच्या डान्समुळे सोशल मीडियावर ट्रोलिंगचा सामना करावा लागला होता. आता गौरव आपल्या पत्नीच्या समर्थनार्थ पुढे आला आहे आणि ट्रोलर्सना उत्तर दिले आहे.

हंगामा स्टुडिओशी बोलताना गौरव म्हणाला- 'मी सर्वप्रथम सगळ्यांना सांगू इच्छितो की आकांक्षा ज्या मुलींसोबत डान्स करत होती, त्या माझ्या पब्लिसिस्टच्या टीमच्या सदस्य होत्या.

बिग बॉस दरम्यान त्यांनी खूप मेहनत केली होती आणि ही त्यांची सक्सेस पार्टी होती. मला डान्स करायला जास्त आवडत नाही, म्हणून आकांशाने विचार केला की ती त्यांच्यासोबत सामील होऊन आनंद घेईल.

गौरव पुढे म्हणतो- 'त्यापैकी अनेकांना हे देखील माहीत नाही की ती कोणासोबत नाचत होती. मी फक्त मागे उभा राहिलो आणि तिला आनंद घेऊ दिला, कारण शेवटी हा माझ्या संघाचा विजय होता. माझ्या अनुपस्थितीत त्यांनीच माझ्यासाठी खूप मेहनत केली होती आणि त्यांनाही आनंदी राहण्याचा हक्क आहे.

ट्रोलर्सबद्दल बोलायचं झालं तर, मला त्यांच्यामुळे काही फरक पडत नाही कारण मला माहीत आहे की ते कोणाचे तरी चाहते आहेत. त्यांचाही काहीतरी उद्देश असतो ज्यामुळे कोणालातरी कमी लेखता येईल. मी आणि आकांक्षा आमच्या आयुष्यात खूप आनंदी आहोत.'

गौरव आणि आकांक्षा एका पार्टीत सहभागी झाले होते. जिथे आकांक्षा पबमध्ये प्रवेश करण्यापूर्वीच काही मुलींसोबत डान्स करते. आकांक्षा डान्स करत असताना, गौरव बाजूला उभा राहून पाहतो. नंतर पुढे जाऊन म्हणतो की, आधी प्रवेश तर करा.

सोशल मीडियावर व्हिडिओ समोर आल्यानंतर काही युजर्सना आकांक्षाचे डान्स मूव्ह्स आवडले नाहीत. त्यांच्या मते ते अपमानकारक होते, त्यानंतर लोकांनी आकांक्षाला ट्रोल करायला सुरुवात केली होती.

# माझे शरीर आता कसे आहे, याने मला फरक पडत नाही

### वॉर-2 मधील बिकिनी सीन पाहून अस्वस्थ झाले होते

किआरा अडवाणी आई झाल्यानंतर पाच महिन्यांनी कामावर परतली आहे. नुकतेच तिने वोग मॅगझिनसाठी फोटोशूट केले आणि मुलाखत दिली. अभिनेत्रीने वोग मॅगझिनला दिलेल्या मुलाखतीत तिच्या शेवटच्या रिलीज झालेल्या 'वॉर-2' चित्रपटातील बिकिनी सीनबद्दल सांगितले आहे. याशिवाय तिने मानसिक आरोग्य आणि इतर अनेक वेगवेगळ्या मुद्द्यांवरही चर्चा केली.

मुलाखतीत किआराने सांगितले की, आजकाल ती आपली मुलगी सरायाहचे हसणे पाहून आपला सर्व थकवा विसरून जाते.

तिने सांगितले की, अशा क्षणांनी आणि मातृत्वानं तिच्या शरीरासोबतच्या तिच्या नात्यात बदल घडवला आहे. मातृत्वच्या तुलनेत एक-दोन किलो वजन कमी करणे महत्त्वाचे वाटत नाही, कारण मातृत्वानंच तिला तिच्या शरीराचे महत्त्व शिकवले आहे.

'वॉर-2' मधील बिकिनी सीनबद्दल बोलताना अभिनेत्री म्हणाली की, तिने चित्रपटात बिकिनी घालण्यासाठी खूप शिस्तीने प्रशिक्षण घेतले होते. पण चित्रपट तेव्हा प्रदर्शित झाला जेव्हा तिने नुकतीच आपल्या मुलीला जन्म दिला होता आणि तिचे शरीर पूर्णपणे वेगळे दिसत होते.

किआरा म्हणते- 'बाळंतपणानंतर माझ्या मनात एक विचार आला की, मला वजन कमी करायला हवे. मी हे आधीही केले आहे. मी ते पुन्हा करेन. मग मला जाणवले की हे सर्वात सुंदर शरीर मिळवण्याबद्दल नाही.'

आता जेव्हा मी माझ्या शरीराकडे पाहते तेव्हा विचार करते- व्वा, तू एका बाळाला जन्म दिलास. याची कशाशीही तुलना होऊ शकत नाही. आता, माझा आकार किंवा माप काहीही असो, मी नेहमी माझ्या शरीराचा आदर करेन. तुम्ही तुमच्या शरीराच्या क्षमतांचा सन्मान केला पाहिजे.'

सांगायचे झाल्यास, किआराने 'वॉर-2' चित्रपटातील 'आवन जावन' गाण्यासाठी बिकिनी परिधान केली होती. किआराचा हा सीन सोशल मीडियावर खूप व्हायरल झाला होता. किआराने 15 जुलै रोजी तिची मुलगी सरायाहला जन्म दिला होता आणि त्यानंतर एका महिन्याने 14 ऑगस्ट रोजी तिचा 'वॉर-2' चित्रपट प्रदर्शित झाला होता.

आता अभिनेत्री लवकरच 'टॉक्सिक' चित्रपटातून पुनरागमन करणार आहे. यात तिच्यासोबत केजीएफ अभिनेता यश मुख्य भूमिकेत दिसणार आहे.



# तू मेरी, मैं तेरा...:जेन झीसाठी 'DDLJ' बनवण्याचा अयशस्वी प्रयत्न, धर्माच्या रोमँटिक ब्रँडमधून आलेली पोकळ प्रेमकथा



'तू मेरी मैं तेरा, मैं तेरा तू मेरी' हा एक असा चित्रपट आहे, जो आजच्या पिढीच्या प्रेमकथेला ९० च्या दशकातील 'दिलवाले दुल्हनिया ले जाएंगे' च्या भावनिक संरचनेत बसवण्याचा स्पष्ट प्रयत्न करतो.

समस्या अशी आहे की, हा चित्रपट ना आजच्या काळातील प्रामाणिक कथा बनू शकला, ना जुन्या काळातील ती जादू पुन्हा निर्माण करू शकला. धर्मा प्रॉडक्शन्स, ज्याची ओळख रोमँटिक चित्रपटांचा एक मजबूत किल्ला म्हणून राहिली आहे, त्याच बॅनरमधून असा विस्कळीत आणि कमकुवत चित्रपट येणे अत्यंत निराशाजनक वाटते.कथा रेहान मेहरा (कार्तिक आर्यन) आणि रूमी (अनन्या पांडे) यांच्याभोवती फिरते. रेहान अमेरिकेत त्याची आई पिंकी (नीना गुप्ता) सोबत राहतो आणि दोघे मिळून वेडिंग इव्हेंट मॅनेजमेंटचा व्यवसाय चालवतात. रूमी आग्रा येथील एक लेखिका आहे, जी तिचे वडील कर्नल अमरवर्धन सिंग (जॅकी श्रॉफ) यांच्याशी खूप जोडलेली आहे.

त्या दोघांची भेट क्रोएशियामध्ये होते आणि तिथूनच एक जबरदस्तीने लादलेलं प्रेम प्रकरण सुरू होतं. चित्रपट स्वतःच कबूल करतो की हे 2025 च्या हुक-अप कल्चर आणि 1990 च्या दशकातील बॉलिवूड रोमान्सचं मिश्रण आहे, पण हे मिश्रण फक्त कागदावरच चांगलं वाटतं.

कथेतील संघर्ष खूप उशिरा येतो आणि तो इतका बनावट आहे की तो फक्त क्लायमॅक्सपर्यंत पोहोचण्याचं एक निमित्त वाटतो. आईशी खूप जोडलेल्या मुलाची आणि वडिलांना सोडू न शकणाऱ्या मुलीची ही कथा भावनिक खोलीपासून पूर्णपणे रिकामी आहे.

कार्तिक आर्यनचा अभिनय या चित्रपटात गरजेपेक्षा जास्त उत्साही आणि असंतुलित दिसतो. तो पूर्ण मेहनत करताना दिसतो, पण भावनांच्या सूक्ष्म छटा पकडू शकत नाही, त्यामुळे अनेक दृश्ये लाऊड होतात.

अनन्या पांडे रूमीच्या भूमिकेत प्रेम आणि कौटुंबिक भावना योग्यरित्या व्यक्त करू शकत नाही. तिच्या अभिनयात स्थैर्य आणि खोलीची कमतरता स्पष्टपणे जाणवते.

नीना गुप्ता आणि जॅकी श्रॉफसारखे अनुभवी कलाकार देखील कमकुवत संवाद आणि बनावट टोनमुळे अनैसर्गिक आणि गोंधळलेले वाटतात. टिंकू तलसानियासारख्या अनुभवी अभिनेत्याला चित्रपटात जवळजवळ निरुपयोगीपणे वापरले आहे.रूमीची बहीण जियाच्या भूमिकेत चांदणीचे पात्र देखील प्रभाव पाडत नाही. इन्फ्लुएन्सर म्हणून, जिथे ती आलिया भट्टची नक्कल करते, तिथे ती खूप अधिक सहज आणि प्रभावी दिसते.

समीर विध्वंस यांचे दिग्दर्शन चित्रपटाला स्पष्ट दिशा देऊ शकत नाही. पटकथा विस्कळीत आहे आणि संवाद इतके क्रिंज आहेत की अनेक ठिकाणी चित्रपट स्वतःवरच ओझे बनतो. संघर्ष उशिरा येतो आणि येताच तो बनावट वाटू लागतो.

संपूर्ण चित्रपटात 'डीडीएलजे'ची सावली इतकी गडद आहे की तो आपली वेगळी ओळख निर्माण करू शकत नाही.

तांत्रिकदृष्ट्या, सिनेमॅटोग्राफी हा एकमेव पैलू आहे जो थोडा दिलासा देतो. अनिल मेहता यांनी क्रोएशिया, राजस्थान आणि आग्रा येथील लोकेशन्स सुंदरपणे चित्रित केली आहेत, परंतु सुंदर दृश्ये कमकुवत कथेला वाचवू शकत नाहीत.

चित्रपटाचे संवाद त्याच्या सर्वात मोठ्या कमकुवतपणांपैकी एक आहेत. कॉमेडीच्या नावाखाली सादर केलेले अनेक संवाद असे आहेत जे हसू नव्हे, तर चिडचिड निर्माण करतात.जेन झी (Gen Z) ची भाषा आणि विचार पकडण्याच्या प्रयत्नात संवाद इतके बनावट आणि जबरदस्तीने 'कूल' बनवले आहेत की ते पूर्णपणे सपाट पडतात. त्यांच्यात ना विनोद आहे ना कोणताही लक्षात राहण्याजोगा प्रभाव.

चित्रपटाचा आणखी एक अत्यंत खटकणारा पैलू म्हणजे नायकाच्या आजूबाजूला असलेल्या वृद्ध स्त्री पात्राला जबरदस्तीने 'लस्टफुल' (कामुक) दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. यामुळे ना विनोद निर्माण होतो, ना कथेला काही योगदान मिळते.याउलट, हे दृश्य चित्रपटाची असंवेदनशीलता उघड करते आणि प्रेक्षकांना अस्वस्थ करते. असे क्षण केवळ निरर्थक वाटत नाहीत, तर अशी मांडणी करण्याची गरज का भासली, असा प्रश्नही निर्माण करतात.

# रणवीर सिंगला डॉन-3 मधून निर्मात्यांनी काढले

### दावा- अभिनेत्याची अयोग्य मागणी हे कारण, स्वत: चित्रपट सोडण्याची बातमी चुकीची



अलीकडेच बातम्या आल्या होत्या की रणवीर सिंग डॉन-3 मधून बाहेर पडला आहे. अभिनेत्याने हा निर्णय 'धुरंधर'च्या यशाच्या कारणामुळे घेतला होता. पण आता नवीन माहितीनुसार, रणवीरने हा चित्रपट सोडला नाही, तर त्याच्या अवाजवी मागण्या आणि क्रिएटिव्ह मतभेदांमुळे त्याला चित्रपटातून काढून टाकण्यात आले आहे.

इंडिया टुडेने सूत्रांच्या हवाल्याने लिहिले आहे की, रणवीरने चित्रपट सोडल्याची बातमी पूर्णपणे अफवा आहे. निर्माते आणि रणवीर यांच्यात क्रिएटिव्ह मतभेद होते. याचा परिणाम असा झाला की निर्मात्यांनी अभिनेत्याला चित्रपटातून बाहेर काढले. निर्माते रणवीरच्या मागण्यांशी सहमत नव्हते.

सूत्रांनी असाही दावा केला आहे की, रणवीरचे मागील तीन चित्रपट सलग फ्लॉप झाले,

पण तरीही फरहान अख्तर आणि रितेश सिधवानी यांनी त्याला संधी दिली. चित्रपट फ्लॉप झाल्यामुळे संजय लीला भन्साळींनी 'बैजू बावरा' रद्द केला होता, पण फरहान-रितेश त्याच्यासोबत उभे राहिले होते.

सांगायचे झाल्यास, दोन दिवसांपूर्वी पिंकविलाने सूत्रांच्या हवाल्याने लिहिले होते की- 'रणवीरला संजय लीला भन्साळी, लोकेश कनगराज आणि ॲटली यांसारख्या चित्रपट निर्मात्यांसोबत काम करायचे आहे. यासोबतच, त्याला एकापाठोपाठ एक गॅंगस्टर चित्रपटांमध्ये दिसण्याची इच्छा नाही. विशेषतः जेव्हा धुरंधरने या जॉनरमध्ये आधीच आपली ओळख निर्माण केली आहे.'

सूत्रांनी पुढे म्हटले होते की- 'याच कारणामुळे रणवीरने निर्माता जय मेहता यांना 'प्रलय'चे शूटिंग आधी करण्यास सांगितले आहे. रणवीर 'डॉन 3' मधून बाहेर पडल्यानंतर स्वतः जय मेहता यांच्या चित्रपटाच्या तारखा आणि वेळापत्रक व्यवस्थित करण्यात व्यस्त आहे, जेणेकरून चित्रपटाचे शूटिंग वेगाने पुढे जाऊ शकेल.' रिपोर्टमध्ये असेही म्हटले आहे की डॉन 3 चे निर्माते अजूनही जानेवारी 2026 च्या अखेरपर्यंत चित्रपटाचे शूटिंग सुरू करू इच्छितात, त्यामुळे त्यांनी मुख्य भूमिकेसाठी अभिनेत्याचा शोध सुरू केला आहे.



# इरफान खान यांची शेवटची लढाई

### कर्करोगाने त्रस्त असतानाही 'अंग्रेजी मीडियम'चे शूटिंग पूर्ण केले, कॉस्ट्यूम डिझायनरने केला खुलासा

बॉलिवूडचे दमदार अभिनेते इरफान खान यांच्या आठवणी आजही चाहत्यांच्या मनात ताज्या आहेत. त्यांच्या 'अंग्रेजी मीडियम' या शेवटच्या चित्रपटाच्या शूटिंगदरम्यानचा एक असा किस्सा समोर आला आहे, जो त्यांच्या व्यावसायिक बांधिलकीला सलाम करायला भाग पाडतो. कॉस्ट्यूम डिझायनर स्मृती चौहान यांनी खुलासा केला की, इरफान कर्करोगाने ग्रासले होते, तरीही शूटिंगदरम्यान ते खूप वेदना सहन करत राहिले.

स्मृती चौहान यांनी डिजिटल कॉमेंट्रीशी बोलताना सांगितले, "इरफान साहेबांची तब्येत सतत बिघडत होती. शूटिंग अनेकदा थांबत असे कारण त्यांचे शरीर साथ देत नव्हते. वेदना इतक्या होत्या की चेहरा फिका पडायचा, पण ते कधीच तक्रार करत नव्हते. 'फक्त एक टेक अजून' असे म्हणून सीन पूर्ण करत असत." चित्रपटाचे दिग्दर्शक होमी अदजानिया यांच्यासोबत काम करताना इरफान यांची मेहनत पाहून संपूर्ण युनिट भावूक होत असे. स्मृती म्हणाल्या, "त्यांच्या डोळ्यात जिद्द होती. कमजोर असूनही डायलॉग डिलिव्हरी परफेक्ट ठेवत असत."

'अंग्रेजी मीडियम' 2019 मध्ये प्रदर्शित झाला होता, ज्यात इरफान वडिलांच्या भूमिकेत होते, जे मुलीची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी धडपड करताना दिसतात. चित्रपटाच्या यशानंतर इरफानचे निधन झाले, पण त्यांचा हा चित्रपट चाहत्यांसाठी अमर झाला.

स्मृती यांनी आठवण करून दिली, "शूटिंगच्या शेवटच्या दिवसांमध्ये ते इतके अशक्त झाले होते की व्हीलचेअरवर यायचे, पण कॅमेरा चालू होताच जादूगार बनत असत."

## अर्थविश्व...

# बाकी सब बुलबुला है... आता फक्त चांदीच तारणहार!



'रिच डॅड, पुअर डॅड'चे लेखक रॉबर्ट कियोसाकी सोशल मीडियावर खूप सक्रिय असताना आणि त्यांच्या पोस्टद्वारे गुंतवणूकदारांना सल्ला देतात. गेल्या काही दिवसांपासून कियोसाकी यांनी बहुतेक पोस्टमधून सोने-चांदी आणि बिटकॉइनमधील गुंतवणूक सल्ल्याला प्राधान्य दिले आहे, पण अलीकडेच त्यांनी चांदीवर विशेषतः फोकस करण्याचे सांगितले.

चांदीच तुम्हाला श्रीमंत करणार

कियोसाकी यांनी याआधी आपल्या पोस्टमध्ये चांदीचे श्रीमंत होण्याचा एक मार्ग म्हणून वर्णन केले होते आणि आता, एका नवीन पोस्टमध्ये त्यांनी पुढील वर्षी $200 पर्यंत पोहोचण्याचे लक्ष्य ठेवले असून चंदेरी धातू खरेदी करण्याची शिफारस केली आहे. त्यांनी दिग्गज गुंतवणूकदार वॉरेन बफेटचा हवाला देत एक नवीन इशारा देखील दिला आहे की, आपण धोकादायक काळात जगत आहोत.

चांदीची किंमत रेकॉर्डतोड वाढणार

रॉबर्ट कियोसाकी यांनी नवीन पोस्टमध्ये गुंतवणूकदारांचे लक्ष चांदीवर केंद्रित करायला सांगितले आणि डॉलरच्या सतत घसरणीचा इशारा दिला. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म ट्विटर (आता एक्स) वरील अकाउंटवरून एका नवीन पोस्टमध्ये, रिच डॅड पुअर डॅडचे लेखक लिहिले आहे की, 'चांदीने $70 ओलांडली आहे, सोने आणि चांदीमधील गुंतवणूकदारांसाठी ही चांगली बातमी आहे आणि बनावट पैसे वाचवणाऱ्यांसाठी वाईट बातमी आहे. मला काळजी आहे की $70 ची चांदी 5 वर्षांत अति हायपर-इन्फ्लेशनचे संकेत देऊ शकते, कारण बनावट अमेरिकन डॉलरचे मूल्य सतत कमी होत आहे.'

प्रसिद्ध लेखक रॉबर्ट कियोसाकी यांनी पोस्टमध्ये चांदीसाठी पुढे चांदीसाठी नवीन टार्गेटही सांगितले. सध्या चांदी $70 असल्याचे सांगत असले तरी, त्यांनी 2026 पर्यंत चांदीचे दर लक्ष्य $200 प्रति औंस पर्यंत वाढवले आहे. त्यांनी गुंतवणूकदारांना डॉलरच्या विरोधात इशारा देत म्हटले आहे की, 'पराभवाचे कारण बनू नका. बनावट डॉलर त्याची ताकद कमी करत राहील. काळजी घ्या.' त्याचवेळी, याधीच्या पोस्टमध्ये त्यांनी म्हटले होते की चांदी 2024 मध्ये फक्त $20 वरून या पातळीवर पोहोचली होती आणि वाढतच राहील.

कियोसाकी यांनी वॉरेन बफे, एक महान गुंतवणूकदार आणि जगातील अव्वल अब्जाधीशांपैकी एक आहेत, बद्दल आणखी एक पोस्ट केली. त्यांनी लिहिले, 'वॉरेन बफेचे पॉडकास्ट अद्भुत आहेत.

# पगारदारांनो, या पेन्शन योजनेत बिनधास्त गुंतवणूक करा! 5000 रुपयांतून मिळवा 92 लाख अन् मासिक पेन्शन



पेन्शन फंड रेग्युलेटरी अँड डेव्हलपमेंट अथॉरिटीने अलीकडेच एनपीएस योजनेत गुंतवणूक करणाऱ्या खाजगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. पीएफआरडीएने बिगर सरकारी कर्मचारी आता निवृत्तीच्या वेळी एकूण एनपीएस गुंतवणुकीपैकी 80% पर्यंत विड्रॉलची परवानगी दिली आणि उर्वरित 20% वार्षिकी किंवा ॲन्युइटी करण्याचे जाहीर केले जेणेकरून त्यांना निवृत्तीनंतर पेन्शन मिळत राहील. याआधी या नियमात अनुक्रमे 60% आणि 40% रेशोला परवानगी होती.

या नियमात बदल झाल्यानंतर पेन्शनची रक्कम कमी होईल, पण एकरकमी रक्कम वाढेल. अशा स्थितीत, तुम्ही आता दरमहा 5000 रुपये गुंतवण्यास सुरुवात केली तर निवृत्तीनंतर तुम्हाला किती पैसे मिळतील आणि तुमची पेन्शनची रक्कम किती असू शकते जाणून घेऊया?

एनपीएस गुंतवणूकदारांना किती फायदा होईल

समजा खाजगी क्षेत्रातील कर्मचारी दरमहा 5000 रुपये गुंतवतो, तर अशाप्रकारे वार्षिक 60,000 रुपये गुंतवणूक होईल. यावर सरासरी व्याजदर 10% आणि निवृत्तीचे वय 60 असे गृहीत धरू, तर ॲन्युइटी केल्यानंतर आपण सरासरी 6% वार्षिक परतावा देखील गृहीत धरू. या अटी पूर्ण केल्यानंतर, गणना अशी असेल...

वयाच्या 30 व्या वर्षी गुंतवणूक करायला सुरुवात केली तर

गुंतवणूक कालावधी: 30 वर्षे — एकूण गुंतवणूक: 18 लाख रुपये

परतावा: सरासरी 10% — एकूण निधी: अंदाजे 1.15 कोटी रुपये

वयाच्या 30 व्या वर्षी 5000 रुपयांची मासिक गुंतवणूक सुरू केल्यास वयाच्या 60 व्या वर्षी एकूण निधी 1.15 कोटी रुपयांपर्यंत पोहोचेल. नवीन नियमांनुसार, गुंतवणूकदार एकूण निधीच्या 80% पर्यंत रक्कम काढू शकतात, म्हणजेच 1.15 कोटी रुपयांपैकी 92 लाख रुपये एकरकमी म्हणून काढले जातील पण 23 लाख रुपयांचे ॲन्युइटी करावी लागेल, जी एकूण निधीच्या 20% असेल.

# पडझडीपासून क्रिप्टो ही नाही सुटले... बिटकॉइनमधील घसरण थांबेना



वर्ष 2025 बिटकॉइन क्रिप्टोकरन्सीसाठी संमिश्र राहिले आणि यावर्षी बिटकॉइनमध्ये लक्षणीय चढ-उतार झाले. या काळात बिटकॉइनने सर्वकालीन उच्चांक गाठला, तर लक्षणीय घट देखील झाली. तज्ज्ञांच्या मते, 2025 बिटकॉइनच्या इतिहासातील सर्वात मोठे 'व्हेल विक्री'चे वर्ष होते. यामुळे बिटकॉइनच्या किमतीत आणखी घसरण होण्याचा धोका वाढला आहे. बिटकॉइनमध्ये विक्रीचा सपाटाइकॉनॉमिक टाइम्सच्या अहवालानुसार ऑन-चेन विश्लेषक अलीचार्ट्सने सांगितले की गेल्या वर्षभरात मोठ्या बिटकॉइन गुंतवणूकदारांनी सातत्याने विक्री केल्याचे डेटावरून समोर आले. अलीचार्ट्सने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर अहवाल दिला आहे की व्हेल किंवा मोठ्या गुंतवणूकदारांनी गेल्या 12 महिन्यांत अंदाजे $15 अब्ज मूल्य किंवा 161,294 बिटकॉइन विकले. तसेच ही परिस्थिती सामान्यतः मोठ्या बाजारातील घसरणीपूर्वी किंवा दरम्यान उद्भवते, जेव्हा किंमती आधीच घसरलेल्या असतात तेव्हा नसल्याचेही त्यांनी पुढे म्हटले.यावर्षी बिटकॉइनने अनेक वेळा नवीन उच्चांक गाठले आहेत, पण जगातील सर्वात मोठ्या डिजिटल चलनातील हालचाल अस्थिर राहिली. बड्या गुंतवणूकदारांकडून मोठ्या प्रमाणात विक्री झाल्यामुळे किमतीत अचानक अनेक घसरण झाली असून बिटकॉइन सध्या $87,000 च्या खाली व्यवहार करत आहे, पण बाजारात विक्रीचा दबाव परत येताच गुंतवणूकदारांचा विश्वास कमकुवत झाला आहे. दरम्यान, सर्वच बडे गुंतवणूकदार विक्री करत नाही आणि मध्यम आकाराचे गुंतवणूकदार वर्षभर निव्वळ खरेदीदार राहिले आहेत. मध्यम आकाराच्या गुंतवणूकदारांना 'शार्क' म्हणतात, ज्यांच्याकडे 100 ते 1000 बिटकॉइन असतात. शार्क खरेदीमुळे व्हेलवरील विक्रीचा दबाव कमी होण्यास मदत झाली, ज्यामुळे की बाजाराचा प्रभाव हळूहळू जुन्या 'व्हेल'वरून अधिक व्यापक सहभागींकडे सरकत असल्याचा अंदाज बांधला जात आहे.

# विजय हजारे ट्रॉफी, पहिल्या दिवशी 22 शतके लागली

## एका दिवसात सर्वाधिक; एका डावात तीन शतके, 38 षटकारही पहिल्यांदाच लागले



विजय हजारे ट्रॉफीच्या सध्याच्या हंगामाची सुरुवात बुधवारी झाली. स्पर्धेच्या पहिल्या दिवशी 22 खेळाडूंनी शतकी खेळी केल्या. एक द्विशतकही झळकावले गेले. स्पर्धेच्या इतिहासात एका दिवसात झळकावलेली ही सर्वाधिक शतके आहेत. यापूर्वी हा विक्रम 12 डिसेंबर 2021 आणि 3 जानेवारी 2025 रोजी झालेल्या 19 शतकांचा होता.

पहिल्या दिवसाचे विक्रम...

केरळच्या विग्नेश पुथुरने त्रिपुरा विरुद्धच्या सामन्यात उत्कृष्ट क्षेत्ररक्षण करत 6 झेल घेतले. यापैकी एक झेल त्याने स्वतःच्याच गोलंदाजीवर घेतला. यासोबतच तो पुरुष लिस्ट-A क्रिकेटमध्ये एका सामन्यात 6 झेल घेणारा पहिला खेळाडू ठरला.

पहिल्या दिवशी बिहारचा सामना अरुणाचल प्रदेशशी झाला. बिहारच्या डावात वैभव सूर्यवंशी (190), साकिबुल गनी (124*) आणि आयुष लोहारुका (116) यांनी शतके झळकावली. विजय हजारे ट्रॉफीमध्ये एका संघाच्या डावात तीन फलंदाजांनी शतके झळकावण्याची ही पहिलीच वेळ होती. बिहारने एकूण 38 षटकार मारले, जे कोणत्याही पुरुष लिस्ट-A डावातील सर्वाधिक आहेत.

कर्नाटकने सर्वात मोठी धावसंख्या यशस्वीरित्या पार केलीया स्पर्धेत कर्नाटकने झारखंडविरुद्ध 413 धावांचे लक्ष्य गाठून विजय हजारे ट्रॉफीमधील सर्वात मोठी धावसंख्या यशस्वीरित्या पार केली. तर, ओडिशाच्या स्वस्तिक समलने 212 धावांची खेळी केली, मात्र त्याचा संघ सामना हरला.

अरुणाचल प्रदेशच्या गोलंदाजांसाठी हंगामातील पहिला सामना खूपच कठीण ठरला. बिहारविरुद्ध मिबोम मोसूने 9 षटकांत 116 धावा दिल्या, जे पुरुष लिस्ट-A क्रिकेटमध्ये कोणत्याही गोलंदाजाने दिलेल्या सर्वाधिक धावा आहेत. इतर दोन गोलंदाजांनीही 90 पेक्षा जास्त धावा दिल्या.बिहारने 574 धावा केल्या, लिस्ट-A मधील सर्वात मोठा स्कोअरअरुणाचल प्रदेशविरुद्ध खेळल्या गेलेल्या सामन्यात बिहारने 50 षटकांत 6 गडी गमावून 574 धावा केल्या, जो पुरुष लिस्ट-A क्रिकेटमधील आतापर्यंतचा सर्वात मोठा स्कोअर आहे. लिस्ट-A क्रिकेटमध्ये दुसऱ्यांदाच असे घडले आहे की एखाद्या संघाने 500 पेक्षा जास्त धावा केल्या आहेत.

यापूर्वी 2022 मध्ये तामिळनाडू क्रिकेट संघाने अरुणाचल प्रदेशविरुद्ध 505 धावा केल्या होत्या. आता त्याच संघाविरुद्ध बिहारने 574 धावा करून तो विक्रमही मागे टाकला आणि नवीन जागतिक विक्रम आपल्या नावावर केला.

अरुणाचल प्रदेशविरुद्धच्या सामन्यात वैभव सूर्यवंशी आणि साकिबुल गनीने अनेक मोठे विक्रम मोडले. सूर्यवंशीने केवळ 59 चेंडूंमध्ये 150 धावा पूर्ण केल्या, जो पुरुष लिस्ट-A क्रिकेटमधील सर्वात वेगवान 150 धावांचा विक्रम आहे. त्याने एबी डिव्हिलियर्सचा विक्रम मोडला. तर साकिबुल गनीने 32 चेंडूंमध्ये शतक झळकावून भारतीय खेळाडूंमध्ये लिस्ट-A मधील सर्वात वेगवान शतक केले. हे पुरुष लिस्ट-A क्रिकेटमधील तिसरे सर्वात वेगवान शतक देखील आहे.

सर्वात कमी वयात शतक करण्याचा विक्रम

वैभव सूर्यवंशीने 14 वर्षे 272 दिवसांच्या वयात शतक झळकावून पुरुष लिस्ट-A क्रिकेटमध्ये सर्वात कमी वयात शतक करण्याचा विक्रमही केला. त्याच्या नावावर आता वरिष्ठ स्तरावर चार शतके झाली आहेत, ज्यात तीन टी-20 क्रिकेटमधील आहेत.

# बावुमा म्हणाला, बुमराह-पंतने माफी मागितली होती

## मैदानातील गोष्टी विसरत नाही, दोघांनी कोलकाता कसोटीदरम्यान बुटका म्हटले होते

दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार टेंबा बावुमा याने भारताच्या विरोधात पहिल्या कसोटी सामन्यादरम्यान झालेल्या वादावर प्रतिक्रिया दिली आहे. त्याने सांगितले की, भारतीय खेळाडू जसप्रीत बुमराह आणि ऋषभ पंत यांनी सामन्यानंतर त्याची माफी मागितली होती. बुमराह आणि पंत यांनी बावुमाला `बौना` (खुजा) म्हटले होते.

ही घटना कोलकाता येथील ईडन गार्डन्सवर खेळल्या गेलेल्या पहिल्या कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवशीची आहे. बुमराहने बावुमाला LBW बाद देण्याची अपील केली, जी पंचांनी फेटाळली. यानंतर बुमराह आणि पंत डीआरएसबद्दल चर्चा करत होते, याच दरम्यान स्टंप माईकमध्ये त्यांचे बोलणे रेकॉर्ड झाले, जे सोशल मीडियावर व्हायरल होऊन वादाचे कारण बनले. यात बुमराह आणि पंत बावुमाला `बौना` (खुजा) म्हणताना ऐकू आले.

मीडिया मॅनेजरने त्यांना याबद्दल सांगितले

आपल्या क्रिकइन्फो कॉलममध्ये बावुमाने लिहिले की, त्याला त्यावेळी या टिप्पणीबद्दल माहिती नव्हती. नंतर संघाच्या मीडिया मॅनेजरने त्याला याबद्दल सांगितले. बावुमाच्या मते, बुमराह आणि पंत दोघांनीही त्याची माफी मागितली. ते म्हणाले, मैदानावर जे घडते ते तिथेच राहते, पण काय बोलले गेले हे तुम्ही विसरत नाही. अशा गोष्टी प्रेरणा आणि ऊर्जेचा स्रोत बनू शकतात, पण यामुळे कोणीही दीर्घकाळ वैर ठेवत नाही.

दक्षिण आफ्रिकेने मालिका 2-0 ने जिंकली होती

बावुमा म्हणाला की, भारताविरुद्धची मालिका नेहमीच कठीण आणि रोमांचक असते. या वादामुळे खेळाडूंमध्ये परस्पर आदर कायम राहिला, असे त्याने स्पष्ट केले. बावुमाच्या नेतृत्वाखाली दक्षिण आफ्रिकेने भारताला कसोटी मालिकेत 2-0 ने हरवले होते. दक्षिण आफ्रिकेने कसोटी मालिका जिंकून 2000 नंतर पहिल्यांदाच ही कामगिरी केली.

बावुमाचा कसोटीतील अजिंक्य विक्रम कायम

दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार टेम्बा बावुमाचा अजिंक्य विक्रम कायम आहे. त्याच्या नेतृत्वाखाली संघाने आतापर्यंत एकही कसोटी सामना गमावलेला नाही. बावुमाने आपल्या कर्णधारपदाच्या 12 सामन्यांपैकी 11 जिंकले आहेत. एक सामना अनिर्णित राहिला आहे.



# ड्रीम-11 बाहेर पडल्यानंतरही BCCI च्या कमाईवर परिणाम नाही

## आर्थिक वर्ष 2026 मध्ये ₹8,963 कोटी कमाईचा अंदाज, ₹1500 कोटी फक्त व्याजातून येतील

BCCI ने ड्रीम-11 च्या प्रायोजकत्वातून बाहेर पडल्यानंतर आणि ICC कडून मिळणाऱ्या महसुलात घट होऊनही आपली आर्थिक स्थिती मजबूत ठेवली आहे. अपेक्स कौन्सिलच्या बैठकीत सादर केलेल्या मसुदा बजेटनुसार, आर्थिक वर्ष 2025-2026 साठी बोर्ड ऑफ कंट्रोल फॉर क्रिकेट इन इंडिया (BCCI) चे एकूण उत्पन्न ₹8,963 कोटी राहण्याचा अंदाज आहे.



ड्रीम-11 ने ऑगस्टमध्ये ₹358 कोटींचा जर्सी प्रायोजकत्वाचा करार संपवला होता. याचे कारण होते सरकारचा `प्रमोशन अँड रेग्युलेशन ऑफ ऑनलाइन गेमिंग ॲक्ट 2025`, ज्याने रिअल मनी गेमिंग (RMG) वर बंदी घातली. ड्रीम-11 चा व्यवसाय याच गोष्टीवर आधारित होता, त्यामुळे करार रद्द करणे आवश्यक झाले होते.

BCCI वर ICC महसुलातील घटीचा परिणाम नाही

BCCI ला ICC कडून 38.5% वाटा मिळतो. या वर्षी ICC स्पर्धांमधून कमी महसूल आल्यामुळे एकूण उत्पन्न मागील वर्षापेक्षा कमी राहण्याचा अंदाज आहे, परंतु BCCI ने ते संतुलित केले आहे.BCCI च्या नवीन प्रायोजकत्व करारांमुळे भरपाई

ड्रीम-11 बाहेर पडल्यानंतर, BCCI ने ॲडिडाससोबत उच्च मूल्यांकनात जर्सी प्रायोजकत्व करार केला आहे. अपोलो टायर्ससोबतही स्वतंत्र करार झाला.

अॅपेक्स कौन्सिलच्या नोटनुसार, ड्रीम-11 सारखे प्रायोजक बाहेर पडले असले तरी, BCCI ने पुढील 2.5 वर्षांसाठी उच्च मूल्यांकनात नवीन जर्सी प्रायोजकत्व करार सुरक्षित केला आहे.

बोर्डाच्या सामान्य निधी आणि अतिरिक्त निधीत वाढ

आर्थिक वर्ष 2024-2025 मध्ये, BCCI चा सामान्य निधी ₹7,988 कोटींवरून वाढून ₹11,346 कोटी झाला. तर अतिरिक्त निधी ₹3,358 कोटी राहिला. मजबूत ट्रेझरी व्यवस्थापनामुळे व्याजाचे उत्पन्नही वाढले आहे.

आव्हानांनंतरही BCCI ची वाढ सुरूच

BCCI IPL, आंतरराष्ट्रीय सामने, ICC वाटा आणि प्रायोजकत्वातून मजबूत महसूल प्रवाहावर अवलंबून आहे. मजबूत आर्थिक व्यवस्थापनामुळे आव्हानांना सामोरे जाऊनही BCCI ची वाढ सुरू आहे.

# श्रेयस अय्यर स्प्लीनच्या दुखापतीतून सावरला, फलंदाजी सुरु केली

## मेडिकल टीमकडून फिटनेस क्लिअरन्सची प्रतीक्षा, ऑस्ट्रेलिया दौऱ्यात जखमी झाला होता

भारतीय फलंदाज श्रेयस अय्यर स्प्लीनच्या दुखापतीतून सावरले आहेत. त्यांनी बुधवारी मुंबईत कोणत्याही त्रासाशिवाय फलंदाजीही केली. TOI ने BCCI च्या सूत्रांच्या हवाल्याने लिहिले की, आता त्यांना कोणताही त्रास होत नाहीये आणि ते कोणत्याही अडचणीशिवाय फलंदाजी करत आहेत.31 वर्षीय श्रेयस अय्यर 25 ऑक्टोबर रोजी ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात जखमी झाले होते. त्यांना सिडनी येथील एका रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्या सामन्यात अय्यरने बॅकवर्ड पॉइंटवरून मागे धावत जाऊन ॲलेक्स कॅरीचा शानदार झेल घेतला होता. यावेळी त्यांच्या डाव्या बरगडीला दुखापत झाली. यानंतर ते ड्रेसिंग रूममध्ये परतले आणि त्यांना तात्काळ रुग्णालयात नेण्यात आले.

अय्यर बंगळूरु येथील बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये चार ते सहा दिवस राहणार आहे. तिथे त्याला क्रिकेटमध्ये परत येण्याच्या वेळापत्रकाबाबत माहिती दिली जाईल.

अय्यरने नियमित जिम आणि फिटनेस रुटीन पुन्हा सुरू केले आहे. दुखापतीनंतरच्या सर्व एक्स-रे आणि तपासण्यांमध्ये कोणतीही चिंतेची बाब समोर आलेली नाही.

अय्यरची निवड फिटनेस क्लिअरन्सवर अवलंबून असेल.

भारताला 11 जानेवारीपासून न्यूझीलंडविरुद्ध 3 एकदिवसीय आणि 5 टी-20 सामन्यांची मालिका खेळायची आहे. यासाठी एकदिवसीय संघाची घोषणा 2 किंवा 3 जानेवारी रोजी केली जाऊ शकते.

अय्यर खेळणार की नाही हे अजून निश्चित नाही, पण या मालिकेत त्याच्या पुनरागमनाला नकारही दिला जाऊ शकत नाही. मात्र, त्याला अजून वैद्यकीय पथकाकडून फिटनेस क्लिअरन्स मिळालेला नाही.

तो विजय हजारे ट्रॉफीतून पुनरागमन करण्याचा प्रयत्न करत आहे. इतकंच नाही, तर तो न्यूझीलंडविरुद्धच्या एकदिवसीय संघासाठीही दावेदार असेल.





# वैभव सूर्यवंशीला शतकानंतर का सोडावी लागली विजय हझारे स्पर्धा



नवी दिल्ली : वैभव सूर्यवंशीने बुधवारीच धडाकेबाज १९० धावांची तुफानी खेळी साकारली होती. पण आता गुरुवारी त्याच्या चाहत्यांसाठी एक वाईट बातमी आली आहे. कारण वैभव सूर्यवंशीला आता विजय हझारे ट्रॉफी स्पर्धा सोडावी लागणार आहे. शतक पूर्ण केल्यावर वैभव सूर्यवंशीबाबत नेमकं घडलं तरी काय, याची माहिती आता समोर आली आहे. वैभव सूर्यवंशीने बुधवारचा दिवस चांगला गाजवला होता. कारण वैभवने विजय हझारे ट्रॉफीच्या पहिल्याच सामन्यात तब्बल १६ चौकार आणि १५ षटकारांची आतिषबाजी केली होती. वैभवने यावेळी फक्त ८४ चेंडूंत १९० धावांची वादळी खेळी साकारली होती. ही खेळी साकारताना वैभव सूर्यवंशीने एबी डिव्हिलियर्सचा मोठा विक्रमही मोडला होता. एबीने वेस्ट इंडिजविरुद्ध २०१५ साली खेळताना आपले जलद शतक झळकावले होते. एबीने ६४ चेंडूंत आपले शतक पूर्ण केले होते, पण वैभवने या सामन्यात फक्त ५९ चेंडूंत शतक पूर्ण केले आणि एबीचा मोठा विक्रम मोडला होता. पण आता वैभव सूर्यवंशीच विजय हझारे ट्रॉफीचा पुढचा सामना खेळणार नसल्याचे समोर आले आहे. वैभव सूर्यवंशीची फलंदाजी पाहण्यासाठी चाहत्यांनी पहिल्या सामन्यात जोरदार गर्दी केली होती. पण आता वैभव यापुढे विजय हझारे ट्रॉफीच्या पुढच्या सामन्यात दिसणार नाही. २६ डिसेंबरला वैभव सूर्यवंशीचा दुसरा सामान होणार होता. पण वैभवला २६ डिसेंबरला नवी दिल्ली येथे आमंत्रित करण्यात आले आहे. कारण या दिवशी राष्ट्रीय बाल खेळाडूंचा सत्कार करण्यात येणार आहे. भारताच्या राष्ट्रपतींकडून त्याचा सत्कार केला जाणार आहे. त्यासाठी त्याला ही स्पर्धा सोडावी लागणार आहे. त्यानंतर भारताचा १९ वर्षांखालील संघ दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यासाठी ३० डिसेंबरला रवाना होणार आहे. त्यामुळे यापुढे वैभव सूर्यवंशीला विजय हझारे ट्रॉफी स्पर्धेत पुढचे सामने खेळता येणार नाही, हे आता स्पष्ट झाले आहे. वैभव सूर्यवंशीने विजय हझारे ट्रॉफीच्या पहिल्याच सामन्यात दणक्यात शतक झळकावले होते, पण यापुढे तो या स्पर्धेत एकही सामना का खेळणार नाही, याचे खरे कारण आता समोर आले आहे.

## महत्त्वाचे...

### शिंदेसेनेकडून 50 जागांची मागणी;भाजप बुचकळ्यात



अमरावती : महानगर पालिकेतील युतीसंदर्भात बुधवार २४ रोजी दुपारी २ वाजता कॅम्प परिसरातील हॉटेल ग्रॅण्ड महफील येथे भाजपा व शिंदेसेनेच्या नेत्यांमध्ये बैठकीच्या दोन फेऱ्या झाल्या. या चर्चेत शिंदेसेनेकडून ५० जागा मिळाल्या तर आनंद वाटेल, अशी मागणी करण्यात आल्यामुळे भाजपाचे स्थानिक नेते बुचकाळ्यात पडले आहेत. कारण, महानगर पालिकेत ८७ जागा आहेत, त्यापैकी ५० जागा म्हणजे ५० टक्क्यांपेक्षा जास्त आहेत. ते बघता युतीतील तिन्ही घटक पक्ष शिंदेसेना, भाजपा व युवा स्वाभिमानपुढे जागा वाटपाचा तिढा सोडवण्याचे आव्हान आहे. यासंदर्भात गुरुवार २५ रोजी सकाळी पुन्हा जागा वाटपाबाबत चर्चा होणार आहे. या बैठकीत प्रभागनिहाय जागांवर खल होणार आहे.आम्ही प्रभागनिहाय जागांवर चर्चा केल्याचे शिंदेसेनेचे नेते आनंदराव अडसूळ यांनी सांगितले तर, आम्ही कोणता उमेदवार या जागेवरून निवडून येणार त्यालाच तिकीट देण्यात यावे, असा आग्रह धरल्याचे भाजपाचे अमरावती जिल्हा निवडणूक प्रभारी आ. संजय कुटे म्हणाले. आम्ही सकारात्मकतेने पुढे जात आहोत. चर्चेत जागा कमी, जास्त होतील. ज्या जागेवर ज्या पक्षाचा उमेदवार निवडून येण्याची शक्यता आहे, तेथे त्या पक्षाचा उमेदवार देणार. निवडून येणे हाच मुख्य निकष आहे. चर्चेच्या दोन फेऱ्या झाल्या आहेत.

### मुलांच्या शिक्षणात कधीही तडजोड करु नका!



अमरावती :भातकुली तालुक्यातील साऊर येथे १८ ते २५ डिसेंबर दरम्यान आयोजित श्रीमद्भ भागवत ज्ञानयज्ञ सप्ताह सध्या भक्तिमय वातावरणात सुरू आहे. आपले विचार व्यक्त करताना सुश्री स्नेहगंगाश्री म्हणाल्या की, मुलांच्या शिक्षणात कधीही तडजोड करू नका, संत गांडगेबाबांचा आदर्श घ्यावा.ज्ञानयज्ञ सप्ताहातील प्रवचनात सुश्री स्नेहगंगाश्री आळंदीकर यांनी कर्मयोगी संत गाडगेबाबांचा मुलांना शिक्षण द्या हा अमूल्य संदेश प्रभावी शब्दांत मांडला. मनुष्य जीवन जगत असताना केवळ सुसंस्कृत नव्हे तर सुशिक्षित असणे अत्यंत आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.गाडगेबाबांच्या विचारांचा उल्लेख करताना त्या म्हणाल्या, भुकेल्यांना अन्न द्या, तहानलेल्यांना पाणी द्या, गरिबांचे लग्न लावून द्या, अनाथांना आसरा द्या, बायकोला कमी भावाचे लुगडे घ्या; पण मुलांच्या शिक्षणात कधीही तडजोड करू नका. विद्यार्थी जीवन कसे असावे आणि विद्यार्थ्यांनी आयुष्य कसे जगावे, हे भागवत कथेच्या माध्यमातून त्यांनी उलगडून सांगितले. आज समाजात पैसा नाही म्हणून शिक्षण सोडणारे अनेक मिळतील. मात्र, पैसा नाही म्हणून दारू सोडणारा एकही सापडणार नाही. असे परखड उपदेश सुश्री स्नेहगंगाश्री यांनी उपस्थितांची मने हेलावून टाकली. शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे खरे साधन असल्याचे त्यांनी ठामपणे नमूद केले. या ज्ञानयज्ञ सप्ताहामुळे साऊर परिसरात भक्ती, संस्कार आणि विचारांची उर्जा निर्माण झाली असून भाविकांकडून कार्यक्रमाचे विशेष कौतुक होत आहे. या सप्ताहा दरम्यान दररोज विविध धार्मिक, आध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. परिसरातील भाविक मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत.

# मढ्याच्या टाळूवरचे लोणी खाणाऱ्यांना बाहेर काढू

## ठाकरे बंधूंच्या युतीवर फडणवीसांचा घणाघात; म्हणाले- महापौर पदासाठी नव्हे, मुंबईकरांसाठी लढाई

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

मुंबई - महापालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठाकरे बंधूंच्या युतीनंतर राजकीय वातावरण तापले असतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आक्रमक भूमिका घेत विरोधकांवर जोरदार हल्ला चढवला आहे. मुंबईत महापौर कोणाला करायचं, यासाठी आमची लढाई नाही, तर महायुतीची सत्ता आणून मुंबईकरांसाठी काम करणाऱ्यांना पुन्हा संधी द्यायची आहे, असा ठाम दावा करत फडणवीसांनी भावनिक राजकारणावरही निशाणा साधला. भ्रष्टाचार, विश्वासघात आणि स्वहिताच्या राजकारणाचा ट्रॅक रेकॉर्ड जनता विसरणार नाही, असा इशारा देत त्यांनी आगामी बीएमसी निवडणूक ही केवळ सत्तेची नव्हे, तर विचारांची लढाई असल्याचं स्पष्ट केलं आहे.

राज्यातील महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मुंबई महापालिकेची लढत सर्वाधिक चर्चेत आली असून, राजकीय वातावरण दिवसेंदिवस अधिकच तापताना दिसत आहे. विशेषतः मुंबई महानगरपालिकेतील सत्तासमीकरणे, मराठी अस्मिता आणि नेतृत्वाचा मुद्दा यामुळे निवडणूक प्रचाराला वेगळीच धार प्राप्त झाली आहे. याच पार्श्वभूमीवर मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी मुंबईचा महापौर मराठीच होणार आणि तो आमचाच होणार, असा ठाम विश्वास व्यक्त केला होता. या वक्तव्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून, ठाकरे बंधूंच्या युतीनंतर या भूमिकेला अधिक महत्त्व प्राप्त झालं आहे. काल माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेऊन शिवसेना ठाकरे गट आणि मनसे युतीची अधिकृत घोषणा केली. या पत्रकार परिषदेत दोघांनीही महाराष्ट्र, मुंबई आणि मराठी माणूस या मुद्द्यांना केंद्रस्थानी ठेवत निवडणूक रणनितीची दिशा स्पष्ट केली.

संयुक्त पत्रकार परिषदेत बोलताना राज ठाकरे यांनी आपल्या वक्तव्यामागील भावना स्पष्ट करताना सांगितले की, कुठलाही वाद, भांडण किंवा राजकीय मतभेद यापेक्षा महाराष्ट्र आणि मराठी माणूस मोठा आहे. हे विधान केवळ एखाद्या मुलाखतीपुरते मर्यादित नसून, ती त्यांच्या मनातील खोल भावना असल्याचे त्यांनी ठामपणे नमूद केले. मुंबईचा कारभार मराठी माणसाच्या हातात असावा, ही भूमिका त्यांनी पुन्हा अधोरेखित केली. ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्याने मुंबईच्या राजकारणात नव्या समीकरणांची जुळवाजुळव सुरू झाली असून, विशेषतः महापौरपदाच्या चर्चेला जोर आला आहे. मराठी अस्मितेचा मुद्दा निवडणुकीत केंद्रस्थानी ठेवण्याचे संकेत या युतीतून देण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर महायुतीकडून येणाऱ्या प्रतिक्रियांकडेही सर्वांचे लक्ष लागले होते.



राज ठाकरे यांच्या मुंबईचा महापौर मराठीच होणार, या विधानावर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट आणि आक्रमक प्रतिक्रिया दिली आहे. मुंबईत कोणाला महापौर बनवायचं, यासाठी आमची लढाई नाही, तर मुंबई महापालिकेत महायुतीची सत्ता आणणं हेच आमचं उद्दिष्ट असल्याचं त्यांनी ठामपणे सांगितलं. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, मुंबई ही कोणाच्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षेचा विषय नसून, मुंबईकरांसाठी चाललेली लढाई आहे. मेलेल्याच्या टाळूवरचे लोणी खाणाऱ्यांना बाहेर काढायचं आहे, अशा शब्दांत त्यांनी अप्रत्यक्षपणे विरोधकांवर टीका केली. तसेच जिहादी मानसिकतेला ठेचण्यासाठी आम्ही मैदानात उतरलो असल्याचं सांगत त्यांनी निवडणूक ही केवळ सत्तेसाठी नसून, विचारांची लढाई असल्याचा दावा केला.

देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईतील भाजपाच्या इतिहासाचाही उल्लेख करत सांगितले की, मुंबईतच अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली भाजपचा जन्म झाला. त्यामुळे अटलजींचं भव्य आणि योग्य स्मारक मुंबईत उभारलं जावं, ही आमची भूमिका आहे. कोणाला महापौर बनवायचं यावर लक्ष केंद्रित करण्यापेक्षा मुंबईकरांच्या विकासासाठी कोण काम करू शकतो, याचा विचार व्हायला हवा, असंही त्यांनी स्पष्ट केलं. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत भावनिक मुद्द्यांपेक्षा कामगिरी महत्त्वाची ठरेल, असा दावा करत त्यांनी महायुतीच्या विकासकामांवर विश्वास व्यक्त केला. मुंबईत सत्तेसाठी नव्हे, तर मुंबईकरांच्या हितासाठी आम्ही लढत असल्याचं त्यांनी अधोरेखित केलं.

# माझ्या डोळ्यासमोर कार्यकर्त्यांचा बळी दिला जातोय

## भाजप आमदार देवयानी फरांदे भावूक

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

मुंबई -"मी गेल्या ४० वर्षांपासून पक्षाची निष्ठावान कार्यकर्ती आहे. पक्षासाठी मी कधीही स्वतःची भूमिका जाहीरपणे मांडली नाही, पण आज माझ्या डोळ्यासमोर सामान्य कार्यकर्त्यांचा बळी दिला जात असेल, तर ते मी सहन करू शकत नाही," अशा शब्दांत नाशिक भाजपच्या महापालिका निवडणूक प्रमुख आणि आमदार देवयानी फरांदे यांनी आपली खंत व्यक्त केली. नाशिकमधील बड्या पक्षप्रवेशानंतर माध्यमांशी बोलताना फरांदे कमालीच्या भावूक झाल्या होत्या, त्यांच्या डोळ्यांत पाणी आले होते.

नाशिकमध्ये आज भाजपने 'इनकमिंग'चा धडाका लावत विरोधी पक्षांतील अनेक बड्या मोहऱ्यांना आपल्या गळाला लावले. मात्र, या पक्षप्रवेशावरून नाशिक भाजपमधील अंतर्गत



कलह चव्हाट्यावर आला आहे. विशेषतः माजी महापौर यतीन वाघ यांच्या प्रवेशाला आमदार देवयानी फरांदे यांचा कडाडून विरोध होता. तरीही त्यांच्या शब्दाला डावलून हे पक्षप्रवेश झाल्याने त्या पक्षप्रवेश सोहळ्याला अनुपस्थित राहिल्या. आता देवयानी फरांदे यांनी माध्यमांसमोर आपली भूमिका स्पष्ट केली.मी विरोध करण्यापेक्षा त्या मतदारसंघाची आमदार म्हणून माझे असे होते की, त्या ठिकाणी सक्षम उमेदवार बबलू शेलार यांचा प्रवेश झालेला होता. बाहेरून आलेला एक आणि त्याच्यासोबत आमचे उर्वरित तीन उमेदवारांना सोबत घेऊन पक्षाचे पॅनल केले गेले असते, तर ते शंभर टक्के निवडून आले असते, असे लोकप्रतिनिधी या नात्याने माझे मत होते. याशिवाय कुणाच्या पक्षप्रवेशाला विरोध करायचे कारण नाही. कार्यकर्ते वर्षानुवर्ष काम करतात, जर निवडून येण्याचे संकेल आपल्याल दिसत आहेत, असे मला वाटत होते. यासाठी मी आजची भूमिका मांडलेली होती, असे देवयानी फरांदे यांनी स्पष्ट केले. देवयानी फरांदे म्हणाल्या, गेल्या ४० वर्षांमध्ये मी स्वत:साठी कधीही जाहीर भूमिका घेतली नाही आणि भविष्यात कधी घेणा नाही. मी पक्षाची निष्ठावान कार्यकर्ती आहे. परंतु सर्वांनीच नेते व्हायचे आणि आपापले बघायचे, मग पक्षाच्या निष्ठावान पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना कुणी पाठबळ द्यायचे? त्यामुळे मी सकाळी सोशल मीडियावर पोस्ट केली होती.

# "माझ्यामुळे भाजपचा पराभव झाला असेल तर तो आनंदच!"

## गिरीश महाजनांच्या 'अपशकुनी' टीकेला एकनाथ खडसेंचे सडेतोड उत्तर

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

जळगाव- नगर परिषद निवडणुकीतील पराभवानंतर जळगाव जिल्ह्यातील राजकारण चांगलेच तापले आहे. भाजप नेते मंत्री गिरीश महाजन यांनी एकनाथ खडसे यांना 'अपशकुनी' म्हणत भुसावळमधील पराभवाचे खापर त्यांच्यावर फोडले होते.

या बोचऱ्या टीकेला प्रत्युत्तर देताना एकनाथ खडसे यांनी महाजनांना चांगलेच धारेवर धरले. मी आता भाजपचा विरोधक आहे, त्यामुळे माझ्यामुळे जर भाजपचा पराभव झाला असेल तर ती माझ्यासाठी आनंदाचीच बाब आहे, असा खोचक टोला खडसे यांनी लगावला.

पराभवाची जबाबदारी झटकू नका! भुसावळसह जळगाव जिल्ह्यात अनेक ठिकाणी भाजपला पराभवाचा सामना करावा लागला आहे.

यावरून महाजनांवर



निशाणा साधताना खडसे म्हणाले की, गिरीश महाजन आपल्या सोयीनुसार बोलतात. जिल्ह्यात ज्यांनी विजयाची जबाबदारी घेतली होती, तेच आता या पराभवाला जबाबदार आहेत.

मग या पराभवाचे खापर दुसऱ्यांवर का फोडता? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. तसेच मुक्ताईनगरमध्ये राष्ट्रवादी (शरद पवार गट) रिंगणातच नसल्याने तिथे आमचा पराभव झाला असे म्हणणे चुकीचे असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

प्रभारी पदाबाबत केला खुलासा जळगाव महापालिका निवडणुकीच्या प्रभारी पदावरून सुरू असलेल्या चर्चांनाही खडसे यांनी पूर्णविराम दिला. संतोष चौधरी यांची प्रभारी म्हणून झालेली नियुक्ती ही आपल्याला विश्वासात घेऊनच करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. मी आजवर कुठल्याही निवडणुकीत प्रभारी पद स्वीकारलेले नाही. महापालिका निवडणुकीत गल्लीबोळांत फिरावे लागते, मात्र माझ्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे मला ते शक्य नाही. म्हणूनच मी स्वतः हे पद नाकारले आहे, मला डावलले गेलेले नाही, असे स्पष्टीकरण खडसेंनी दिले.

जळगावात संघर्ष पेटणार आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या तोंडावर या दोन दिग्गज नेत्यांमधील कलह जिल्ह्याच्या राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावण्याची शक्यता आहे.

महाजनांची 'अपशकुनी' ही टीका आणि खडसेंनी दिलेले 'आनंदाची बाब' हे उत्तर, यामुळे जळगाव जिल्ह्यातील राजकीय वातावरण चांगलेच ढवळून निघाले आहे.

# पक्षप्रवेशांमुळे भाजपमध्ये हुकूमशाही, तो सत्तेसाठी झपाटलेला

## सत्तेसाठी भाजपला सगळे चालतात; विजय वडेट्टीवारांचा घणाघात

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

मुंबई - राज्यातील आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी भारतीय जनता पक्षावर जोरदार हल्ला चढवला आहे. भाजपमध्ये सत्तेसाठी निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलले जात असून, बाहेरून येणाऱ्यांना डोक्यावर बसवले जात असल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केला आहे. निष्ठावंतांना घरी बसवा आणि बाहेरच्यांना वर बसवा, हेच आज भाजपचं धोरण झालं आहे, असा घणाघाती आरोप करत त्यांनी भाजपच्या पक्षप्रवेश मोहिमेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. सत्तेच्या हव्यासापोटी भाजप कोणालाही जवळ करत असल्याचा टोला देत त्यांनी पक्षातील अंतर्गत अस्वस्थतेकडे लक्ष वेधलं आहे.

नाशिकमध्ये नुकत्याच घडलेल्या भाजप पक्षप्रवेशाच्या पार्श्वभूमीवर बोलताना विजय



वडेट्टीवार यांनी स्थानिक आमदार आणि कार्यकर्त्यांच्या भावना दुखावल्या जात असल्याचा मुद्दा उपस्थित केला. नाशिकमध्ये भाजपच्या पक्षप्रवेश कार्यक्रमामुळे एका आमदाराच्या डोळ्यात पाणी आलं, ही परिस्थिती खूप काही सांगून जाते, असं म्हणत त्यांनी भाजपवर हुकूमशाही पद्धतीने निर्णय घेतल्याचा आरोप केला. स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात न घेता वरून लादलेले निर्णय घेतले जात असल्याने भाजपमध्ये अंतर्गत लोकशाही संपुष्टात आली असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. सत्तेसाठी कोणताही विचार न करता पक्षप्रवेश स्वीकारले जात असल्याने भाजप हा सत्तेसाठी झपाटलेला पक्ष बनल्याची टीका वडेट्टीवार यांनी यावेळी केली.

भाजपवर आणखी आक्रमक शब्दांत टीका करताना विजय वडेट्टीवार म्हणाले की, सत्ता मिळवण्यासाठी भाजपला सगळे चालतात. चोर, बलात्कारी, खुनी, तसेच ईडी आणि सीबीआयच्या कारवायांशी संबंधित लोकही भाजपसाठी चालतात. या शब्दांत त्यांनी भाजपच्या राजकारणावर गंभीर आरोप केले. भाजप सत्तेचा वापर तपास यंत्रणांच्या माध्यमातून विरोधकांवर दबाव आणण्यासाठी करत असल्याचा आरोप करत त्यांनी भाजपच्या नैतिकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं. भाजपसाठी सत्ता हाच एकमेव अजेंडा राहिल्यामुळे पक्षातील मूळ कार्यकर्ते आणि निष्ठावंत नेते बाजूला पडत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

दरम्यान, मुंबईतील दादर येथे पार पडलेल्या महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या महत्त्वपूर्ण बैठकीनंतर विजय वडेट्टीवार यांनी काँग्रेसची भूमिका स्पष्ट केली. या बैठकीत राज्यातील आगामी महापालिका निवडणुकांचा सखोल आढावा घेण्यात आला. स्थानिक परिस्थिती, संभाव्य उमेदवार, संघटनात्मक ताकद आणि कार्यकर्त्यांची मनोभूमिका यावर सविस्तर चर्चा झाल्याची माहिती त्यांनी दिली. प्रत्येक महानगरपालिकेची राजकीय स्थिती वेगळी असल्याने एकसारखा निर्णय लादला जाणार नाही, असे स्पष्ट करत त्यांनी स्थानिक नेतृत्वाला महत्त्व दिले जाणार असल्याचे सांगितले.महापालिका निवडणुकांबाबत काँग्रेसची रणनीती स्पष्ट करताना विजय वडेट्टीवार म्हणाले की, जिथे शक्य असेल तिथे आघाडी करून निवडणूक लढवली जाईल आणि जिथे आघाडी शक्य नाही, तिथे काँग्रेस स्वबळावर निवडणुकीला सामोरे जाईल. स्थानिक नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची भावना लक्षात घेऊनच अंतिम निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

# जितेंद्र आव्हाड आमचे दुश्मन नाहीत

## ठाण्यात दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार असल्याची चर्चा

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

मुंबई- आगामी महापालिकेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने राजकीय समीकरणे बदलताना दिसत आहेत. काही जागांवर महायुती एकत्र लढणार आहे, तर काही जागांवर स्वबळावर लढणार असल्याची माहिती समोर आली आहे. पुण्यात अजित पवारांची राष्ट्रवादी आणि शरद पवारांची राष्ट्रवादी एकत्र येणार असल्याचे जवळपास निश्चित झाले असतानाच आता ठाण्यातही त्याच दिशेने हालचाल सुरू असल्याचे दिसत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे नजीब मुल्ला हे एकमेकांचे कट्टर विरोधक समजले जातात. परंतु, नजीब मुल्ला यांच्या वक्तव्याने सर्वांच्याच भुवया उंचावल्या



आहेत. जितेंद्र आव्हाड हे आमचे दुश्मन नाहीत, आम्हाला जर कोणाचा प्रस्ताव आला तर आम्ही तो पक्षश्रेष्ठींकडे पाठवू आणि त्यावर विचार करू, असे मोठे वक्तव्य नजीब मुल्ला यांनी केले आहे. त्यामुळे ठाण्यातही दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार असल्याच्या चर्चेने जोर धरला आहे.नजीब मुल्ला म्हणाले, जितेंद्र आव्हाड आमचे दुश्मन नाहीत. 30 तारखेपर्यंत जर आम्हाला कोणाचा प्रस्ताव आला तर आम्ही तो पक्षश्रेष्ठींकडे पाठवणार आणि त्यावर विचार करणार. शेवटी कार्यकर्त्यांना निवडून आणायचे आहे.

# अमरावतीच्या प्रवाशांना तिकीट दरवाढीचा फटका नाही

## सामान्य श्रेणीत इंटरसिटीचे नागपूरपर्यंत, अंबा, सुरत एक्सप्रेससाठी वरणगावपर्यंत द्यावे लागणार नाही वाढीव भाडे

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

मुंबई- अमरावती अंबानगरीतील रेल्वे प्रवाशांना येत्या २६ डिसेंबरपासून लागू होणाऱ्या रेल्वे तिकीट दरवाढीचा फारसा फटका बसणार नाही. कारण, अमरावतीहून नागपूरला जायचे असल्यास इंटरसिटी किंवा जबलपूर एक्सप्रेसने प्रवासी जातात. नागपूरचे अमरावतीपासूनचे अंतर सुमारे १५० कि.मी. आहे. तसेच, रेल्वे तिकीट दरवाढ ही सामान्य श्रेणीसाठी २१५ कि.मी. अंतरापर्यंत लागू नसल्याने नागपूरहून अमरावतीला येणे किंवा नागपूरला जाणे यासाठी एकही पैसा जास्त खर्च करावा लागणार नाही, ही दिलासादायक बाब आहे. केवळ २१५ कि.मी. पेक्षा जास्त अंतर जायचे असेल तर त्या अंतरावरील रेल्वे स्टेशनपासून पुढे १ पैसा प्रति किलोमीटर वाढीव दर द्यावा लागणार आहे.अर्थात, मेमू आणि इंटरसिटी या गाड्यांनी कोणतेही अतिरिक्त शुल्क न देताच प्रवाशांना नागपूर, अकोला, शेगांव, वरणगांवपर्यंत जाता येईल. अमरावतीहून वरणगांवचे रेल्वेने अंतर २१५ कि.मी. आहे. मात्र, तेथून पुढे प्रति कि.मी. १ पैसा याप्रमाणे अतिरिक्त तिकीट दर द्यावा लागेल. सुरत एक्सप्रेसने जर सामान्य कोचमधून प्रवास करायचा असेल तरीही १ पैसा, मेल, एक्सप्रेस जसे अंबा अमरावती-मुंबई सीएसएमटी, अमरावती-पुणे या गाड्यांसाठी २ रु. प्रति कि.मी. अंतराने शुल्क द्यावे लागेल. तर एसी कोचमध्ये प्रवासाकरिता २ पैसे प्रति कि.मी. दराने वाढीव तिकीट खरेदी करावे लागणार आहे. याचाच अर्थ ५०० कि.मी. पर्यंत नॉन एसीने प्रवास करण्यासाठी १० रु. अतिरिक्त द्यावे लागतील. तर एसी कोचने ५०० कि.मी. पर्यंत प्रवास करण्यासाठी २० रु. लागतील.

मेमू, मासिक पासच्या शुल्कात वाढ नाही जे चाकरमाने दररोज नोकरीच्या निमित्ताने जवळच्या शहरांमध्ये रेल्वेने प्रवास करतात, त्यांच्याकडे मासिक पास असते. अशा पासकरिता कोणतीही दरवाढ करण्यात आली नाही. त्याचप्रमाणे उपनगरीय रेल्वेलाही दरवाढीतून वगळण्यात आले आहे. त्यामुळे अमरावती-बडनेरा, अमरावती-भुसावळ मेमूच्या तिकिटासाठी अतिरिक्त पैसे द्यावे लागणार नाहीत. त्यामुळे रेल्वे प्रवाशांना यामुळे दिलासा मिळाला.

एक्सप्रेस आणि मेलच्या एसी प्रथम, द्वितीय श्रेणी तसेच द्वितीय श्रेणी एसीसाठी २ पैसे प्रति कि.मी. तिकीटांमध्ये दरवाढ आहे. उदाहरणच घ्यायचे असल्यास, अंबा एक्सप्रेसने दादरपर्यंत प्रवास करायचा असल्यास एकूण ६६३ कि.मी. अंतर आहे. यासाठी सामान्य श्रेणीसाठी भुसावळ स्टेशनपासून दादरपर्यंत १ पैसा प्रति कि.मी. दराने ४ रु. ४८ पैसे जास्त द्यावे लागतील.कारण हे अंतर ४४८ कि.मी. आहे. मूळ तिकीट खरेदी करतानाच तिकीटामध्ये ही वाढ लागून येईल. मात्र, द्वितीय श्रेणी स्लीपर कोच आणि प्रथम श्रेणी एसीसाठी अमरावती स्टेशनपासूनच दरवाढ द्यावी लागेल. अर्थात, १३ रु. २६ पैसे २६ डिसेंबरपासून अतिरिक्त द्यावे लागतील, अशी प्राथमिक माहिती मध्य रेल्वेच्या भुसावळ कार्यालयाद्वारे देण्यात आली. २६ रोजी रेल्वेचे सॉफ्टवेअर अपडेट होईल. तिकिटात नेमकी किती दरवाढ झाली ते स्पष्ट होईल, असेही सांगण्यात आले.

